अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ०१

नगरसचिव कार्यालय
दिनांक : ०५/०४/२०२१

प्रति,
मा. -------------------------------------
स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा क्र.०१ गुरूवार दि.०८/०४/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात आरोग्य विषयक निकष, कोवीड १९ संदर्भातील विहीत कार्यपध्दतीचे पालन करुन प्रत्यक्ष सहभागाने / उपस्थीतीने खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

मा.शासन आदेशान्वये सदर सभेत मास्कचा वापर, योग्य शारीरीक अंतर,हाताची स्वच्छता,सर्दी व खोकतांना घ्यावयाची काळजी,सॅनिटायझरचा वापर यांचे पालन करुन सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

सही /-
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये

**गुरूवार दिनांक - ०८/०४/२०२१ ची विषय पत्रिका.**

| **विषय क्र.** | **विषय सुची** |
|---|---|
| ०१ | अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितवस्ती सुधार योजना सन-२०१९-२०२०अंतर्गत प्रभाग क्र. १५ व १६ मधील पावसाळी गटार व रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे ई- निविदा क्र.६१८३५२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ०२ | अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितवस्ती सुधार योजना सन-२०१९-२०२० अंतर्गत प्रभाग क्र.१ मधील २५० एमएम ,३०० एमएम,४५० एमएम एन.पी-२ क्लास आरसीसी पाईप गटर करणे व रस्ते डांबरीकरण करणे ई-निविदा क्र. ६४०९६० या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ०३ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड,कंम्पोस्टींग प्लॉटसाठी शेड उभारणे ई -निविदा सुचना क्र.७१ ई-निविदा क्र.६४४०९८ सन २०२०-२१ निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ०४ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत नविन प्लॅट फॉर्म बांधणे ई-निविदा सुचना क्र.७३ ई -निविदा क्र.६४४१४० सन २०२०-२१ निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ०५ | अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत विविध कामांकरीता ई-निविदा सुचना क्र.७० ई -निविदा क्र.६४४०७५ सन २०२०-२१ निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ०६ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ई-निविदा क्र.६६३६२८ प्रभाग क्र.०५ चैतन्य नगर ओपन स्पेसमध्ये योगा भवन बांधकाम करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| ०७ | अर्जदार मालमत्ताधारक श्री. संजय रंगनाथ सांगळे ,रा. चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.५४, बिल क्र. ७२१ या नळ जोड अस्तित्वात नसतांना आकारलेली नळजोडापोटीची रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ०८ | अर्जदार मालमत्ताधारक श्री. भगवान महादू पोटे रा.आयोघ्या,केडगांव यांना प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. ३९ , बिल क्र. १७५ व १७६ एकाच मिळकतीचे दोन वेगवेगळी बीले येत असून मालमत्ता बील क्र.१७६ रद्द करून रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ०९ | अहमदनगर महानगरपालिका शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आयटीआय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना श्री. लखन नवनाथ कर्डीले व इतर १० यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १० | अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी१] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड),२]स्वप्नाली प्रताप इंगावले यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहामहिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| ११ | अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी १] भालेराव संतोष छबु,२] आशिष रमेश शेलार,३] खान इम्रान आयुब यांची मानधनावर करारबध्द पध्दतीने नियुक्त्या करणे मुदतवाढीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १२ | अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड, २) मनिष कैलास सोनवणे, ३) सागर दिलीप जाधव, ४) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १४ | अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १५ | अहमदननगर शहर पाणीपुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १६ | अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामध्ये कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मेंकॅनिकल) यापदावर श्री. किरण सुरेश बल्लाळ यांना नियुक्ती मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट |
| १७ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लावी दगडू यांचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट |

| | |
|---|---|
| १८ | अहमदनगर महानगरपालिकेचे उदयाने सुभोभिकरण करिता सामाजिक संस्था खाजगी कंपनी इतर जिजामाता उदयान, अप्पू हत्ती चौकातील नेहरू उदयान इतर देखील उदयाने बी.ओ.टी. तत्वावर मा.श्री.प्रकाश भागानगरे नगरसेवक यांना पत्रानुसार देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| १९ | अर्जदार नगरसेवक/नगरसेविका श्री.उमेश खंडेराव कवडे, सौ. सोनाली अजच चितळे ,सौ. सुवर्णाताई संजय गेनप्पा,श्री. नरेंद्र कुलकर्णी , श्री. सुभाष लोंढे यांचे पत्रानुसार प्रभाग क्र.२ मध्ये विवेकानंद चौक गुजर गल्ली येथील शितळादेवी पटांगण येथील व्यायाम शाळेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २० | अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरिता तांत्रिक / अतांत्रिक कर्मचा-यासह अभियंते उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे कामी निविदा प्रसिध्द करणेस मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २१ | मा. जिल्हा न्यायालयीन इमारतीची महानगरपालिकेची पाणीपटटी शास्ती कमी करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट. |
| २२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहातील सोनोग्राफी केंद्राकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी रेडीओलॉजिस्ट डॉक्टरांची प्रति केस मानधन प्रमाणे तीन वर्षाकरिता पॅनलशिपवर नेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

सही /-
प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत-** विषय क्रमांक- ०१ ते २२ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ०१ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितवस्ती सुधार योजना सन-२०१९-२०२०अंतर्गत प्रभाग क्र. १५ व १६ मधील पावसाळी गटार व रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे ई- निविदा क्र.६१८३५२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग.

उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी अ.नगर यांची दि.२६/०३/२०२०
२. ऑनलाईन ई - निविदा क्र. ६१८३५२ / सन २०१९-२० दि.२१/१०/२०२०
३. निविदा विक्री कालावधी :- दि.२१/१०/२०२० ते ०४/११/२०२०
४. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.२१/१०/२०२० ते दि.०४/११/२०२०
५. निविदा उघडण्याची तारीख :- दि.०६/११/२०२०
६. कामाची मुदत :- ३ महिने
७. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील दि.२०/०१/२०२१ च्या तांत्रिक छाननी समिती नुसार

| ई - निविदा क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६१८३५२ | प्र.क्र.१५ व १६ मधील अचानक वस्ती ,गौतम नगर मध्ये अंतर्गत भागामध्ये ड्रेनेज लाईन टाकणे व सिमेंट कॉक्रीटीकरण करणे केडगांव लिंकरोड ते डॉ.जगताप ते सुखकर्जा बंगला व डीपी रोड ते सावली सोसायटी वे गायत्री हौसिंग सोसायटी पर्यत पावसाळी गटार व रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | ४५,६५,८२५/- | आंबादास चौधरी अ.नगर | ७.९९% कमी दराने | गुलशन कंन्स्ट्रक्शन अ.नगर |
| | | | गुलशन कंन्स्ट्रक्शन अ.नगर | ९.९९% कमी दराने | |
| | | | अभिजीत काळे अ.नगर | ०.९९% कमी दराने | निविदा दारापेक्षा ९.९९% कमी दराने |
| | | | सुनिल राउत अ.नगर | ५.३४% कमी दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक गुलशन कंन्स्ट्रक्शनअ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ९.९९% कमी दराने भरली आहे.सदरची निविदा कमी दराची आहे.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्या सर्वात कमी दराची आहे.निविदाधारकाने संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार रक्कम रूपये ४६,००० (अक्षरी रक्कम रू.शेहेचाळीस हजार मात्र) (सामान्य पावती क्र.एफ १०४ /७३११ दिनांक ८/२/२०२१) दिलेल्या मुदतीच्या आत भरलेली आहे.

तरी गुलशन कंन्स्ट्रक्शनअ.नगर यांची सर्वात कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे कनिष्ठ अभियंता सार्व.बांधकाम विभाग यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील अहवालानुसार प्राप्त निविदांपैकी स्पर्धात्मकदृष्या सर्वात कमी दराची म्हणजे निविदा दरापेक्षा ९.९९% कमी दराची निविदा मान्य करणेस हरकत नाही. आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र शासन सार्व.बांधकाम विभाग शासन निर्णय क्र.सी.एसी -२०१७/प्र.क्र.०८दिनांक २७/०९/१८ मधील परिच्छेद क्र.१.१ मध्ये वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करावयाचा स्तर नमुद आहे.त्याप्रमाणे विभागाने खात्री करून प्रस्तावित केले नुसार "अ" प्रमाणे कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, नागरी दलीत वस्ती सुधार योजना सन २०१९-२० अंतर्गत प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा गुलशन कंन्स्ट्रक्शन यांची निविदा दरापेक्षा ९.९९ % कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा. स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितवस्ती सुधार योजना सन-२०१९-२०२०अंतर्गत प्रभाग क्र. १५ व १६ मधील पावसाळी गटार व रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे ई- निविदा क्र.६१८३५२ या निविदेच्या मंजुरीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शेख मुदस्सर :- निविदे बाबतची माहिती सांगा.

मा.सभापती साहेब :- विभाग प्रमुखांनी सदस्यांनी विचारलेली माहिती दयावी.

शहर अभियंता श्री. इथापे :- डी.पी.टी.सी.तुन नागरी दलित वस्ती सुधार योजनातुन नियत अनुदान मिळालेले आहे प्रभाग क्र.१५ व १६ अंतर्गत कामे ड्रेनेज लाईन टाकणे ,कॉक्रीटीकरण पावसाळी गटरची कामे प्रस्तावीत केली आहेत. ४ टेंडर प्राप्त झाले असून स्पर्धात्मकदृष्टया कमी ९.९९ दराची निविदा प्रशासनाने शिफारस केली आहे. त्यास मंजुरी मिळावी.

मा.सौ. वंदना ताठे :- विषय क्र. १ ते २ पर्यत ई -निविदा आहेत मंजूर करा. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे :-विषय क्र. १ ते २ पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-विषय क्र.१ ते २ पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. नागरी दलीत वस्ती सुधार योजना सन २०१९-२० अंतर्गत प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा गुलशन कंन्स्ट्रक्शन यांची निविदा दरापेक्षा ९.९९ % कमी दराची निविदा आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितवस्ती सुधार योजना सन-२०१९-२०२०अंतर्गत प्रभाग क्र. १५ व १६ मधील पावसाळी गटार व रस्त्यांचे कॉक्रीटीकरण करणे ई- निविदा क्र.६१८३५२ या प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी दराची निविदा गुलशन कंन्स्ट्रक्शन यांची निविदा दरापेक्षा ९.९९ % कमी दराची निविदा आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ०२ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितवस्ती सुधार योजना सन-२०१९-२०२० अंतर्गत प्रभाग क्र.१ मधील २५० एमएम ,३०० एमएम,४५० एमएम एन.पी-२ क्लास आरसीसी पाईप गटर करणे व रस्ते डांबरीकरण करणे ई-निविदा क्र. ६४०९६० या निविदेच्या मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग
उपरोक्त विषयान्वये खालिल प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकिय मान्यता :- मा.जिल्हाधिकारी अ.नगर यांची दि.२६/०३/२०२०
२. ऑनलाईन ई - निविदा क्र.६४०९६० / सन २०२०-२१ दि.२८/०१/२०२१ (निविदेची ३ री वेळ)
३. निविदा विक्री कालावधी :- दि.२८/०१/२०२१ ते ०३/०२/२०२१
४. निविदा स्विकारण्याची तारीख :- दि.२८/०१/२०२१ ते दि.०३/०२/२०२१
५. निविदा उघडण्याची तारीख :- दि.०५/०२/२०२१
६. कामाची मुदत :- ६ महिने
७. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील दि.०२/०३/२०२१ च्या तांत्रिक छाननी समिती नुसार

| ई - निविदा क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६४०९६० | प्र.क्र.१ मधील जयभवानी नगर अंतर्गत श्री.कर्डीले घर ते झुरळे घर व खेडके घर ते पवार घर ते गोसावी घरापर्यंत २५० एम.एम.एन.पी २ क्लास आर सी सी पाईप गटर व झिने घर ते बारस्कर घरापर्यत ४५० एम.एम.एन.पी २ क्लास आर.सी.सी. पाईप गटर व भिस्तबाग महाल ते श्री.मोहन बारस्कर ते श्री.रोहिदास बारस्कर घर ते किलोर घरापर्यंत ३०० एम.एम. एन.पी.२ क्लास आर. सी. सी. पाईप गटर करणे तसेच रोहीदास बारस्कर घर ते किलोर घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे तसेच पुण्यश्लोक कॉलनी ,ग्लोबल कॉलनी,दत्तनगर कॉलनी व कसबे वस्ती अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे व ३०० एम.एम.एन.पी.२ क्लास पाईप गटर करणे . | ४६,४९,३५०/- | मे.ए.पी. सोनीमंडलेचा अ.नगर | निविदा दरापेक्षा ०.१७ टक्के कमी | मे.ए.पी. सोनीमंडलेचा अ.नगर<br>निविदा दारापेक्षा ०.१७% कमी |

वरील रकाना क्र.६ मध्ये नमुद निविदाधारक मे.ए.पी.सोनीमंडलेचा ,अ.नगर यांनी सदरची निविदा निविदा दरापेक्षा ०.१७% कमी दराने भरली आहे.सदरची निविदा कमी दराची आहे.

तरी मे.ए.पी.सोनीमंडलेचा अ.नगर यांची सर्वात कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे उप अभियंता,सार्व.बांधकाम विभाग श्री.एम.एस.पारखे यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता,यांचा अभिप्राय की,वरील अहवालानुसार स्पर्धात्मकदृष्या सर्वात कमी दराची म्हणजे निविदा दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१७% कमी दराची निविदा स्वीकारणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ प्रकरण मधील कलम ७३ क प्रमाणे विभागाने कार्यवाही करावी. प्रस्तावित "अ" प्रमाणे निविदादरा पेक्षा ०.१७% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

यावर सहाय्यक आयुक्त (सा) यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचे अभिप्राय व प्रस्तावितनुसार निविदा मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,चर्चा करा.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,चर्चा केली. नागरी दलीत वस्ती सुधार योजना सन २०१९ -२० अंतर्गत प्रभाग क्र.१ मध्ये रस्ते डांबरीकरण व पाईप गटर करणे या कामाकरिता फेर ई - निविदे मध्ये प्राप्त सर्वात कमी ई - निविदा ए.पसोनीमंडलेचा यांची निविदा दरापेक्षा ०.१७ % कमी दराची निविदा मान्यतेस्तव मा. स्थायी समिती कडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितवस्ती सुधार योजना सन-२०१९-२०२० अंतर्गत प्रभाग क्र.१ मधील २५० एमएम ,३०० एमएम,४५० एमएम एन.पी-२ क्लास आरसीसी पाईप गटर करणे व रस्ते डांबरीकरण करणे ई-निविदा क्र. ६४०९६० या निविदेच्या मंजुरीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ. वंदना ताठे :-विषय क्र.१ ते २ पर्यत ई-निविदा आहेत मंजूर करा.ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ.सोनाबाई शिंदे:-विषय क्र. १ ते २ पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-विषय क्र.१ ते २ पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. अहमदनगर महानगरपालिका नागरी दलीत वस्ती सुधार योजना सन २०१९ -२० अंतर्गत प्रभाग क्र.१ मध्ये रस्ते डांबरीकरण व पाईप गटर करणे या कामाकरिता फेर ई - निविदे मध्ये प्राप्त सर्वात कमी ई - निविदा ए.पीसोनीमंडलेचा यांची निविदा दरापेक्षा ०.१७ % कमी दराची निविदा वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका नागरी दलितवस्ती सुधार योजना सन-२०१९-२०२० अंतर्गत प्रभाग क्र.१ मधील २५० एमएम ,३०० एमएम,४५० एमएम एन.पी-२ क्लास आरसीसी पाईप गटर करणे व रस्ते डांबरीकरण करणे फेर ई-निविदा क्र. ६४०९६० या प्राप्त निविदांपैकी सर्वात कमी ई -निविदा ए.पी.सोनीमंडलेचा,अहमदनगर यांची निविदा दरापेक्षा ०.१७% कमी दराची निविदा वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ०३ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड,कंम्पोस्टींग प्लॉटसाठी शेड उभारणे ई -निविदा सुचना क्र.७१ ई-निविदा क्र.६४४०९८ सन २०२०-२१ निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकिय मान्यता-मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर मनपा यांची दि.२७/०१/२०२१

२. ऑनलाईन निविदा क्र.६४४०९८/सन २०२०-२१ दि.०४/०२/२०२१

३. निविदा विक्री कालावधी दि.०४/०२/२०२१ ते दि.११/०२/२०२१

४. निविदा स्विकारणेचा कालावधी - दि.०४/०२/२०२१ ते दि.११/०२/२०२१

५. निविदा उघडण्याचा कालावधी - दि.१५/०२/२०२१ पासून

६. कामाची मुदत - १० महिने

७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल-शासन निर्णय क्र.सीएटी२०१७/प्र.क्र.-८इमा-२दि.२७/९/१८नुसार कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे.तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे.तपासणीअंती त्रुटी आढळून आल्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी इकडील जा.क्र.१९३ दि.१७/२/२०२१ अन्वये पत्र देण्यांत आले. कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर अपुर्ण कागदपत्रांसह दि.२/३/२०२१ रोजी तांत्रिक छाननी घेण्यात आली.छाननीमध्ये ठेकेदारांच्या मागणीनुसार व मा.राष्टीय हरित लवाद यांचे काम जलद गतीने होण्याच्या आदेशानुसार इकडील पत्र जा.क्र.२१५२ दि.०८/३/२०२१अन्वये कागदपत्र पुर्ततेसाठी पाच दिवसांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली.त्यानुसार दि.१८/३/२०२१व्दितीय तांत्रिक छाननी घेण्यात आली.त्यानुसार मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर व श्री.राजेंद्र लक्ष्मण लोणकर ,अहमदनगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने ते पात्र व श्री.ए. झेड कोठारी ,अ.नगर,श्री.धिरज बाळासाहेब पाटिल,अ.नगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने ते अपात्र करण्यात आलेले आहे.दि.१८/३/२०२१ तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी शर्तीनुसार मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर व श्री.राजेंद्र लक्ष्मण लोणकर, अहमदनगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने व्यापारी लिफाफा उघडणेस व श्री.ए.झेड.कोठारी,अ.नगर, श्री.धीरज बाळासाहेब पाटिल,अ.नगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने त्यांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवू नये अशी शिफारस केलेली आहे.त्यानुसार पात्र निविदाधारक यांचा व्यापारी लिफाफा दि.२३/३/२०२१रोजी उघडण्यात आलेला असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. निविदाबाबत मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब बोराटे यांची विविध पत्रान्वये तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.सदर तक्रारींची छाननी करून तक्रारीचे समाधानकारक उत्तर देवून तक्रार निकाली काढण्यात आलेली आहे.

| ई - निविदा क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ई -निविदा सुचना क्र.७१ ६४४०९८ सन २०२०-२१ | अ) अहमदनगर मनपा हद्दीतील मौजे बुरूडगांव स.न.३४ कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड बांधणे<br>ब) अहमदनगर मनपा हद्दीतील मौजे बुरूडगांव स.नं.३४ कचराडेपो अंतर्गत कंम्पोस्टींग प्लॅटसाठी शेड उभारणे | १,१६,४२,७३४ (GST व्यतिरीक्त) | मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन अहमदनगर<br>श्री.राजेंद्र लक्ष्मण लोणकर अहमदनगर | निविदा दराने निविदा<br>दरापेक्षा २.००% जादा दराने | मे.ओमसाई कंन्स्ट्र.अ.नगर व निविदा दराने |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची आहे.

तरी कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची सर्वात कमी दराची म्हणजे निविदा दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर. " "अ"

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "अ" प्रमाणे निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समिती कडेस सादर करणे योग्य.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ प्रकरण मधील कलम ७३ क प्रमाणे विभागाने कार्यवाही करावी.

प्रस्तावित अ प्रमाणे निविदा दराची निविदा मंजूरीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड,कंम्पोस्टींग प्लॉटसाठी शेड उभारणे ई -निविदा सुचना क्र.७१ ई-निविदा क्र.६४४०९८ सन २०२०-२१ निविदा मंजुरीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शाम नळकांडे :- निविदेची माहिती सांगा

शहर अभियता श्री. इथापे :- बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड,कंम्पोस्टींग प्लॉटसाठी शेड उभारणेकरिता मा.राष्टीय हरित लवाद यांचे काम जलद गतीने होण्याच्या आदेशानुसार इकडील पत्र जा.क्र.२१५२ दि.०८/३/२०२१अन्वये कागदपत्र पुर्ततेसाठी पाच दिवसांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे.

मा.श्री. मुदस्सर शेख :- विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा आहेत मंजूर करा. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :-विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :-विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड,कंम्पोस्टींग प्लॉटसाठी शेड उभारणे ई -निविदा सुचना क्र.७१ ई-निविदा क्र.६४४०९८ सन २०२०-२१ निविदा निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड,कंम्पोस्टींग प्लॉटसाठी शेड उभारणे ई -निविदा सुचना क्र.७१ ई-निविदा क्र.६४४०९८ सन २०२०-२१ निविदा निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ०४ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४मध्ये कचराडेपो अंतर्गत नविन प्लॅट फॉर्म बांधणे ई-निविदा सुचना क्र.७३ ई-निविदा क्र.६४४१४०सन२०२०-२१निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग
विषय-ई-निविदा सुचना क्र.७३ ई -निविदा क्र.६४४१४० सन २०२०-२१ या निविदेच्या मंजुरीबाबत
संदर्भ- इकडील पत्र जा.क्र.१९३ दि.१७/०२/२०२१

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकिय मान्यता - मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर मनपा यांची दि.२७/०१/२०२१
२. ऑनलाईन ई- निविदा क्र.६४४१४०/सन २०२०-२१ दि.०४/०२/२०२१
३. निविदा विक्री कालावधी दि.०४/०२/२०२१ ते दि.११/०२/२०२१
४. निविदा स्विकारणेचा कालावधी - दि.०४/०२/२०२१ ते दि.११/०२/२०२१
५. निविदा उघडण्याचा कालावधी - दि.१५/०२/२०२१ पासून
६. कामाची मुदत - ०६ महिने
७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल -शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.-८इमा-२दि.२७/०९/१८नुसार कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे.तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे.तपासणीअंती त्रुटी आढळून आल्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी इकडील जा.क्र.१९३दि.१७/२/२०२१अन्वये पत्र देण्यात आले.कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर अपुर्ण कागदपत्रासह दि.०२/३/२०२१ रोजी तांत्रिक छाननी घेण्यात आली.छाननीमध्ये ठेकेदारांच्या मागणीनुसार व मा.राष्टीय हरित लवाद यांचे काम जलद गतीने होण्याच्या आदेशानुसार इकडील पत्र जा.क्र.२१५२ दि.८/३/२०२१अन्वये कागदपत्र पुर्ततेसाठी पाच दिवसांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली.त्यानुसार दि.१८/३/२०२ व्दितीय तांत्रिक छाननी घेण्यात आली.त्यानुसार मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अ.नगर व मे.एस.एफ.शेख,कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने ते पात्र व श्री.धीरज बाळासाहेब पाटिल,अ.नगर व श्री.सुनिल रामराव राउत,अहमदनगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने ते अपात्र करण्यात आलेले आहे दि.१८/३/२०२१ तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्तीनुसार मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,अहमदनगर व एस.एफ.शेख कंन्स्ट्रक्शन,अ.नगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने व्यापारी लिफाफा उघडणेस व मे.श्री.धिरज बाळासाहेब पाटिल, अ.नगर व श्री.सुनिल रामराव राउत,अ.नगरयांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने त्यांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवू नये अशी शिफारस केलेली आहे. त्यानुसार पात्र निविदाधारक यांचा व्यापारी लिफाफा दि.२३/३/२०२१ उघडण्यात आलेला असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे. निविदाबाबत मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब बोराटे यांची विविध पत्रान्वये तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.सदर तक्रारींची छाननी करून तक्रारीचे समाधानकारक उत्तर देवून तक्रार निकाली काढण्यात आलेली आहे.

| ई - निविदा क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई - निविदा सुचना क्र.७२ ६४४१४० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे बुरूडगाव स.नं.३४ कचराडेपो अंतर्गत नवीन प्लॅट फॉर्म बांधणे | रू.६१,५०,४६४/- (GST व्यतिरिक्त) | मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन अहमदनगर | निविदा दराने | मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन अहमदनगर व निविदा दराने |
| सन २०२०-२१ | | | मे. एस.एफ. शेख, कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर | निविदा दरापेक्षा २.००% जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची आहे.

तरी कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची सर्वात कमी दराची म्हणजे निविदा दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर. /अ

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "अ" प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा मा.स्थायी समिती कडेस सादर करणे योग्य.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ प्रकरण मधील प्रकरण ७ कलम ७३ क प्रमाणे कार्यवाही करावी.करून प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाही सादर

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४मध्ये कचराडेपो अंतर्गत नविन प्लॅट फॉर्म बांधणे ई-निविदा सुचना क्र.७३ ई-निविदा क्र.६४४१४०सन२०२०-२१ निविदा मंजुरीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शाम नळकांडे :- निविदेची माहिती सांगा

शहर अभिंयता श्री. इथापे :- बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड,कंम्पोस्टींग प्लॉटसाठी शेड उभारणेकरिता मा.राष्टीय हरित लवाद यांचे काम जलद गतीने होण्याच्या आदेशानुसार इकडील पत्र जा.क्र.२१५२ दि.०८/३/२०२१अन्वये कागदपत्र पुर्ततेसाठी पाच दिवसांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे.

मा.श्री. मुदस्सर शेख :-  विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा आहेत मंजूर करा. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :-विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- :-विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४मध्ये कचराडेपो अंतर्गत नविन प्लॅट फॉर्म बांधणे ई-निविदा सुचना क्र.७३ ई-निविदा क्र.६४४१४०सन२०२०-२१ निविदा निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४मध्ये कचराडेपो अंतर्गत नविन प्लॅट फॉर्म बांधणे ई-निविदा सुचना क्र.७३ ई-निविदा क्र.६४४१४०सन२०२०-२१ निविदा निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ०५ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत विविध कामांकरीता ई-निविदा सुचना क्र.७० ई -निविदा क्र.६४४०७५ सन २०२०-२१ निविदा मंजुरीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

विषय-ई-निविदा सुचना क्र.७० ई -निविदा क्र.६४४०७५ सन २०२०-२१ या निविदेच्या मंजुरीबाबत

संदर्भ- इकडील पत्र जा.क्र.१९३ दि.१७/०२/२०२१

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकिय मान्यता -मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त अहमदनगर मनपा यांची दि.२७/०१/२०२१
२. ऑनलाईन ई- निविदा क्र.६४४०७५/सन २०२०-२१ दि.०४/०२/२०२१
३. निविदा विक्री कालावधी दि.०४/०२/२०२१ ते दि.११/०२/२०२१
४. निविदा स्विकारणेचा कालावधी - दि.०४/०२/२०२१ ते दि.११/०२/२०२१
५. निविदा उघडण्याचा कालावधी - दि.१५/०२/२०२१ पासून
६. कामाची मुदत - १० महिने
७. प्राप्त झालेल्या निविदेचा तपशिल - शासन निर्णय क्र.सीएटी २०१७/प्र.क्र.-८ इमा-२ दि.२७/०९/१८नुसार कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे.तांत्रिक लिफाफा उघडल्यानंतर कागदपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे.तपासणीअंती त्रुटी आढळून आल्या त्रुटींची पुर्तता करण्यासाठी इकडील जा.क्र.१९३ दि.१७/०२/२०२१ अन्वये पत्र देण्यात आले. कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर अपुर्ण कागदपत्रासह दि.०२/०३/२०२१ रोजी तांत्रिक छाननी घेण्यात आली.छाननीमध्ये ठेकेदारांच्या मागणीनुसार व मा.राष्टीय हरित लवाद यांचे काम जलद गतीने होण्याच्या आदेशानुसार इकडील पत्र जा.क्र.२१५२ दि.०८/०३/२०२१ अन्वये कागदपत्र पुर्ततेसाठी पाच दिवसांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली.त्यानुसार दि.१८/०३/२०२१ व्दितीय तांत्रिक छाननी घेण्यात आली.त्यानुसार मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर व श्री. राजेंद्र लक्ष्मण लोणकर,अहमदनगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने ते पात्र व श्री. सुनिल रामव राउत, अहमदनगर , श्री. धीरज बाळासाहेब पाटील, अहमदनगर व श्री. अभिजीत अशोक काळे, अहमदनगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने ते अपात्र करण्यात आलेले आहे. दि.१८/०३/२०२१ रोजीच्या तांत्रिक छाननी समितीने निविदा अटी व शर्ती नुसार मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन, अहमदनगर व श्री. राजेंद्र लक्ष्मण लोणकर, अहमदनगर यांनी कागदापत्रांची पुर्तता केलेली असल्याने व्यापारी लिफाफा उघडणेस व श्री.सुनिल रामराव राउत, अहमदनगर , श्री.धीरज बाळासाहेब पाटील, अहमदनगर व श्री. अभिजीत काळे, अहमदनगर यांनी कागदपत्रांची पुर्तता केलेली नसल्याने त्यांचा व्यापारी लिफाफा उघडण्यात येवु नये अशी शिफारस केलेली आहे. त्यानुसार पात्र निविदाधारक यांचा व्यापारी लिफाफा दि.२३/०३/२०२१ रोजी उघडण्यात आलेला असून त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.निविदाबाबत मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब बोराटे यांची विविध पत्रान्वये तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.सदर तक्रारींची छाननी करून तक्रारीचे समाधानकारक उत्तर देवून तक्रार निकाली काढण्यात आलेली आहे.

| ई - निविदा क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई - निविदा सुचना क्र.७० ६४४०७५ सन २०२०-२१ | अ] अहमदनगर मनपा हद्दीतील मौजे बुरूडगाव स.नं.३४ कचराडेपो अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे (मुख्य प्रवेशद्वार ते प्लॅटफॉर्म ते मान्सुन शेड व प्लॅटफॉर्म ते कंम्पोस्टींग प्लॅट फॉर्म ) (ABCD&BL) | १,१३,४५,७८२/- (GST व्यतिरिक्त) | मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन , अहमदनगर | निविदा दराने | मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन , अहमदनगर व निविदा दराने |
| | ब] अहमदनगर मनपा हद्दीतील मौजे बुरूडगाव स.नं.३४ कचराडेपो अंतर्गत कचराडेपोच्या मान्सुन शेड शेजारील रस्ता (DE ) करणे | | श्री. राजेंद्र लक्ष्मण लोणकर, अहमदनगर | निविदा दरापेक्षा २.०० % जादा दराने | |
| | क]अहमदनगर मनपा हद्दीतील मौजे बुरूडगाव स.नं.३४ कचराडेपो अंतर्गत कचराडेपोच्या पश्चिमेकडील रस्ता ( EF) करणे | | | | |
| | ड] अहमदनगर मनपा हद्दीतील मौजे बुरूडगाव स.नं.३४ कचराडेपो अंतर्गत दक्षिणेकडील मुख्य प्रवेशद्वार ते प्रस्तावीत कंपस्ट प्लँट (LKJ) | | | | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची आहे.

तरी मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची सर्वात कमी दराची म्हणजे निविदा दराची निविदा मान्यतेस्तव मा.स्थायी समितीपुढे ठेवणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर. /अ

येणेप्रमाणे शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर मा.शहर अभियंता यांचा अभिप्राय की,वरील "अ" प्रमाणे प्रस्ताव मान्यतेस मा.स्थायी समिती कडेस सादर करणे योग्य.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ प्रकरण -७ कलम ७३ क प्रमाणे विभागाने कार्यवाही करावी. प्रस्तावित अ प्रमाणे निविदा दराची निविदा मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर)यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत विविध कामांकरीता ई-निविदा सुचना क्र.७० ई -निविदा क्र.६४४०७५ सन २०२०-२१ निविदा मंजुरीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शाम नळकांडे :- निविदेची माहिती सांगा

शहर अभियंता श्री. इथापे :- बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत मान्सुम शेड,कंम्पोस्टींग प्लॉटसाठी शेड उभारणेकरिता मा.राष्टीय हरित लवाद यांचे काम जलद गतीने होण्याच्या आदेशानुसार इकडील पत्र जा.क्र.२१५२ दि.०८/३/२०२१अन्वये कागदपत्र पुर्ततेसाठी पाच दिवसांची अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे.

मा.श्री. मुदस्सर शेख :- विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा आहेत मंजूर करा. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :-विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- विषय क्र.३ ते ५पर्यत ई -निविदा मंजूर करण्यात याव्यात. अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत विविध कामांकरीता ई-निविदा सुचना क्र.७० ई -निविदा क्र.६४४०७५ सन २०२०-२१ निविदा निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरूडगांव स.नं.३४ मध्ये कचराडेपो अंतर्गत विविध कामांकरीता ई-निविदा सुचना क्र.७० ई -निविदा क्र.६४४०७५ सन २०२०-२१ निविदा निविदाधारक मे.ओमसाई कंन्स्ट्रक्शन,रचना हौसींग सोसायटी ,फकीरवाडा,अहमदनगर यांची निविदा निविदा दराने आलेली असुन "ती वाजवी वाटत आहेत.सदरची निविदा स्पर्धात्मकदृष्टया सर्वात कमी दराची असल्याने निविदेस ही सभा मान्यत देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही/-

अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ०६ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ई-निविदा क्र.६६३६२८ प्रभाग क्र.०५ चैतन्य नगर ओपन स्पेसमध्ये योगा भवन बांधकाम करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व. बांधकाम विभाग

विषय-ई-निविदा क्र.६६३६२८अहमनगर महानगरपालिका हददीतील प्रभाग क्र.०५ चैतन्य नगर ओपन स्पेसमध्ये योगा भवन बांधकाम करणे

उपरोक्त विषयान्वये खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

१. प्रशासकिय मान्यता - मा. आयुक्त अहमदनगर मनपा यांची दि.०४/०२/२०२१ ची मान्यता
२. निविदा क्र. ६६३६२८/सन २०२०-२१
३. निविदा विक्री कालावधी -दि. १५/०३/२०२१ ते २२/०३/२०२१
४. निविदा स्विकारणेचा कालावधी - दि. १५/०३/२०२१ ते २३/०३/२०२१
५. निविदा उघडण्याचा तरीख - दि. २४/०३/२०२१
६. कामाची मुदत - ६ महिने

दिनांक १८/३/२०२१ रोजी झालेल्या छाननी समितीने निविदा अटी शर्ती नुसार कागदपत्रांची पुर्तता केलेल्या ठेकेदारांचा व्यापारी लिफाफा उघडणेस शिफारस केली आहे. त्यानुसार सदरची व्यापारी लिफाफा दिनांक २५/०३/२०२१ रोजी उघडण्यात आलेली आहे. प्राप्त झालेल्या निविदांचा तपशील

| ई - निविदा क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम GST व्यतिरिक्त | निविदा दाखल करणारे ठेकेदार | निविदेमध्ये भरलेला दर निविदा दरापेक्षा | सर्वात कमी दराचे निविदाधारक व त्यांचा दर |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ई-निविदा क्र.६६३६२८ सन २०२०-२०२१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.०५ चैतन्यनगर ओपन स्पेसमध्ये योगा भवन बांधकाम करणे | ३५,७१,४२९/- | मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं., अहमदनगर | अंदाजपत्रक दराप्रमाणे | मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं., अहमदनगर अंदाजपत्रक दराप्रमाणे |
| | | | श्री. राजेंद्र लक्ष्मण लोणकर अहमदनगर | निविदा दरापेक्षा ७% जादा दराने | |

वरील तुलनात्मक तक्त्याच्या अनुषंगाने स्पर्धात्मकदृष्टया रकाना क्र.५ मध्ये नमुद निविदा धारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं., अहमदनगर यांची निविदा स्पर्धात्मकदृष्टया दृष्टया कमी दराची म्हणजे अंदाजपत्रक दराने प्राप्त झालेली आहे.

तरी स्पर्धात्मक दृष्टया सर्वात कमी दराची मे. बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं., अहमदनगर यांची अंदाजपत्रक दराची निविदा मा.स्थायी समिती पुढे ठेवणेस ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./अ

येणेप्रमाणे उपअभियंता यांचा अहवाल असे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ मधील प्रकरण ७ कलम ७३-क प्रमाणे विभागाने कार्यवाही करून प्रस्तावीत "अ" प्रमाणे निविदा करावी निविदा निविदा दराने मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, अंदाजपत्रकीय दराची निविदा मा.स्थायी समिती पुढे ठेवण्यास मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ई-निविदा क्र.६६३६२८ प्रभाग क्र.०५ चैतन्य नगर ओपन स्पेसमध्ये योगा भवन बांधकाम करणेबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ई-निविदा क्र.६६३६२८ प्रभाग क्र.०५ चैतन्य नगर ओपन स्पेसमध्ये योगा भवन बांधकाम करणेबाबतची निविदा धारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं., अहमदनगर यांची निविदा स्पर्धात्मकदृष्टया दृष्टया कमी दराची म्हणजे अंदाजपत्रक दराने प्राप्त असल्याने या निविदेस ही सभा मान्यत देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील ई-निविदा क्र.६६३६२८ प्रभाग क्र.०५ चैतन्य नगर ओपन स्पेसमध्ये योगा भवन बांधकाम करणेबाबतची निविदा धारक मे.बेस्ट कंन्स्ट्रक्शन कं., अहमदनगर यांची निविदा स्पर्धात्मकदृष्टया दृष्टया कमी दराची म्हणजे अंदाजपत्रक दराने प्राप्त असल्याने या निविदेस ही सभा मान्यत देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
सभापती,<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ०७ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ताधारक श्री. संजय रंगनाथ सांगळे ,रा. चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.५४, बिल क्र. ७२१ या नळ जोड अस्तित्वात नसतांना आकारलेली नळजोडापोटीची रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.१ सावेडी

मालमत्ताकर वसुली वॉर्ड क्र.५४ चे वसुली लिपिक श्री.एस.सी. तायडे याजकडून विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, मालमत्ता कर वसुली वॉर्ड क्र.५४ अनुक्रमांक ७२१ (Z१५४०५६७१०) या मालमत्तेवर मनपा अभिलेखास नोंद असलेले मालमत्ता धारक श्री. एस.आर. सांगळे यांनी दिनांक ०२/१२/२०२०रोजी अर्ज देउन त्यांच्या वरील अनुक्रमांकावर नोंद असलेल्या मालमत्तेत नळ जोड नसतांना आकारलेली नळजोडा पोटीची रक्कम रदद करून मालमत्ता कराचे दुरूस्त देयक मिळणेबाबत व नळजोडा पोटी आकारलेल्या रकमेवरील शास्तीकराची रक्कम रद्द करणेबाबत विनंती अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदार श्री. एस. आर. सांगळे यांच्या विनंती अर्जानुसार जावळ क्रमांक प्रभाग समिती क्र.१ सावेडी ४१२ दिनांक २२/१२/२०२० अन्वये पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचेमार्फत पाणी पुरवझा फिटर यांचा सदरील मालमत्तेत नळजोड आस्तित्वात आहे किंवा नाही याबाबतचा स्थळ पहाणी अहवाल सादर करणेबाबत कळविले असता पाणीपुरवझा फिटर व प्रभाग अभियंता सावेडी पाणीपुरवठा विभाग यांनी दिनांक ०५/०१/२०२१ रोजी जागेची समक्ष स्थळ पहाणी करून श्री. एस.आर. सांगळे यांच्या अ-१०८ प्रेमदान हडको या मालमत्तेत नळजोड अस्तित्वात नसलेबाबत अहवाल सादर केलेला आहे.

तसेच अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जानुसार मालमत्ता कर वसुली विभागाकडील अभिलेखाची व संगणक प्रणालीची पडताळणी केली असता मालमत्ताधारक यांना सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता बिल क्र.AMC २०२१ ०३२००६८० दि.१/४/२०२० अदा केलेले असुन मागील एकुण थकबाकी ९९५४३/- रूपये दर्शविलेली असुन पाणीपटटी करापोटी २९०७६ रूपये दर्शविलेली असुन शास्ती पोटी २% दंडात्मक करापोटी ६३११८ रूपये दर्शविले आहेत तसेच सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षापोटी १५०० रूपये पाणीपटटी कराची रक्कम दर्शविलेली असुन पाणीपटटी कराच थकबाकी रक्कम + चालु पाणी पटटी कराची रक्कम मिळुन ३०५७६/- रूपये असल्याचे निदर्शनास येते आज दिनांक ४/०२/२०२१ रोजी संगणकावर मालमत्ता कर व पाणीपटटी देयकाची पडताळणी केली असता एकुण थकबाकी १०४३९२/- रूपये असल्यचे निदर्शनास येते.

तरी पाणीपुरवठा फिटर व प्रभाग अभियंता पाणीपुरवठा विभाग सावेडी यांच्या दिनांक ५/१/२०२१ च्या स्थळपहाणी अहवालानुसार सदरील मालमत्तेत नळजोड नसल्याने नळजोडापोटी आकारलेली पाणीपटटी कराची रक्कम रूपये ३०५७६/-व पाणीपटटी कराच्या रकमेवर सन २०१९-२०२० अखेर आकारण्यात आलेली शास्तीची रक्कम (दंडात्मक कर ) ५८७५८/-रूपये व सदरचा प्रस्ताव मान्य होईपर्यत आकारण्यत येणा-या शास्ती (दंडात्मक कर) रकमेचे वजाचे समायोजन करून मालमत्ता धारक यांना दुरूस्त देयक देणेबाबत व मान्यतेप्रमाणे संगणक प्रणाली व तत्सम अभिलेखास दुरूस्ती करणेबाबत अहवाल मान्यतेस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक यांचा अहवाल असे.

यावर कर निरीक्षक यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार मालमत्ता धारक श्री. एस.आर.सांगळे यांच्या मालमत्तेत नळजोड नसल्याचे मनपा फिटर यांच्या यांनी अहवाल दिला आहे तरी नळ जोड नसताना केलेली कर आकारणी शास्तीसह कमी करणे उचित वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर प्रभाग अधिकारी क्र.१ यांचा अभिप्राय की, कर निरीक्षक यांचा अभिप्राय तसेच मनपा फिटर यांचा रिपोर्ट तसेच वसुली लिपिक यांच्या प्रस्तावानुसार नळजोड नसतांना लागलेली आकारणी कमी कणे उचित वाटते .

यावर रिव्हीजन विभाग यांचा अभिप्राय की, नळजोड नसतांना नळपटटीची आकारणी झालेली आहे ती रद्द करून त्यावरील नळपटटीची रक्कम वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती कडे रक्कम निर्लेखित करणेसाठी प्रस्ताव सादर करणे विषयी आदेशार्थ सादर/अ

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. संजय रंगनाथ सांगळे ,रा. चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.५४,बिल क्र.७२१ या नळजोड अस्तित्वात नसतांना आकारलेली नळजोडापोटीची रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ.वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- माझ्याकडे व मा.स्थायी समिती सदस्य यांना श्री. महेश रमेश टाक , सफाई कामगार यांनी भेटून समितीकडे परिक्षाधीन कालावधीतील तात्पुरती नियुक्ती रद्द करून सेवा समाप्ती करण्यात आल्याने या विरूध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५६(४) अन्वये अपिल अर्ज दिला आहे. आस्थापना विभाग प्रमुख माहिती सांगा.

आस्थापना विभाग प्रमुख श्री. साबळे :- श्री. महेश रमेश टाक , सफाई कामगार यांची लाड कमिटीच्या शिफारशीनुसार वारस नेमणूक देण्यात आलेली होती. ते कामावर हजर होते.परंतु मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचेकडील दि.१८/०२/२०१९ रोजीच्या प्रस्तावान्वये तोफखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असल्याने नियुक्ती आदेशातील अट क्र.१५ अन्वये सेवा समाप्त करण्यात आली आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- त्यांच्यावर तोफखाना पो.स्टे. मध्ये जे गुन्हे दाखल झाले होते त्यांचा निकाल मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.३) अहमदनगर यांनी त्यांना अपराधातुन पुराव्या अभावी निर्दोष मुक्त केले आहे. निर्दोष मुक्तता झाल्याने त्यांना कामावर घेण्यात यावे.

मा.श्री. मुदस्सर शेख :- श्री. महेश रमेश टाक , सफाई कामगार यांची नोकरी अभावी उपासमार होत आहे. त्यांच्यावर कुटुंबाची जबाबदारी आहे.मा. न्यायालयाने निर्दोष मुक्त केले असल्याने झालेली कारवाई मागे घेण्यात येवुन त्यांना कामावर घेण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. संजय रंगनाथ सांगळे ,रा. चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.५४,बिल क्र.७२१ या नळजोड अस्तित्वात नसतांना आकारलेली नळजोडापोटीची रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मान्यत देत आहे.

श्री. महेश रमेश टाक, सफाई कामगार यांचेवर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचेकडील दि.१८/०२/२०१९ रोजीच्या प्रस्तावान्वये तोफखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असल्याने नियुक्ती आदेशातील अट क्र.१५ अन्वये सेवा समाप्त विषयी प्रशासनाने घेतलेल्या निर्णयावर अर्जदार यांनी स्थायी समिती कडे केलेल्या अपिलअर्जा वर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे. १] तोफखाना पो.स्टे. मध्ये जे गुन्हे दाखल झाले होते त्यांचा निकाल मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.३) अहमदनगर यांनी त्यांना अपराधातुन पुराव्या अभावी निर्दोष मुक्त केले आहे. निर्दोष मुक्तता झाल्याने आरोपीत कर्मचारी यांना एक वेळ अखेरची संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. २] त्यांना अहमदनगर महानगरपालिका सेवेतुन बडतर्फ कालावधीचा पगार भत्ते इत्यादी देण्यात येवु नयेत.३] कामावर हजर झालेनंतर आठ दिवस जरी वरिष्ठांचे पुर्व परवानगी न घेता ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी न घेता म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेत यावे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार अर्जदार मालमत्ताधारक श्री. संजय रंगनाथ सांगळे ,रा. चितळे रोड,अ.नगर यांना प्रभाग समिती क्र.१ वॉर्ड क्र.५४,बिल क्र.७२१ या नळजोड अस्तित्वात नसतांना आकारलेली नळजोडापोटीची रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मान्यत देत आहे.

श्री.महेश रमेश टाक, सफाई कामगार यांचेवर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांचेकडील दि.१८/०२/२०१९ रोजीच्या प्रस्तावान्वये तोफखाना पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल असल्याने नियुक्ती आदेशातील अट क्र.१५ अन्वये सेवा समाप्त विषयी प्रशासनाने घेतलेल्या निर्णयावर अर्जदार यांनी स्थायी समिती कडे केलेल्या अपिलअर्जा वर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१] तोफखाना पो.स्टे. मध्ये जे गुन्हे दाखल झाले होते त्यांचा निकाल मा.न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग (न्यायालय क्र.३) अहमदनगर यांनी त्यांना अपराधातुन पुराव्या अभावी निर्दोष मुक्त केले आहे. निर्दोष मुक्तता झाल्याने आरोपीत कर्मचारी यांना एक वेळ अखेरची संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

२] त्यांना अहमदनगर महानगरपालिका सेवेतुन बडतर्फ कालावधीचा पगार भत्ते इत्यादी देण्यात येवु नयेत.

३] कामावर हजर झालेनंतर आठ दिवस जरी वरिष्ठांचे पुर्व परवानगी न घेता ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी न घेता म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेत यावे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्र. ०१

विषय क्रमांक- ०८ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार मालमत्ताधारक श्री. भगवान महादू पोटे रा.आयोघ्या,केडगांव यांना प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. ३९ , बिल क्र. १७५ व १७६ एकाच मिळकतीचे दोन वेगवेगळी बीले येत असून मालमत्ता बील क्र.१७६ रद्द करून रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका केडगाव विभाग प्रभाग समिती क्र.४

वरील संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट वॉर्ड नं.३९ चे वसुली लिपिक यांजकडून देण्यात येतो की, श्री. भगवान महादु पोटै रा. अयोध्यानगर केडगाव यांनी दिनांक १८/१२/२०१९ रोजी अर्ज देउन कळविले आहे की, माझी मिळकत क्र.स.नं.५६ प्लॉट नं.४५ अयोध्यानगर केडगाव येथे असून मला एकाच मिळकतीची दोन मागणी बिले येतात. माझी पत्नी सौ. शोभा भगवान पोटे यांच्या नावावर बिल नं.१७६ मालमत्ता क्र.Z४३९१२२७०० हे एक मागणी बिल आहे व दुसरे मागणी बिल श्री. भगवान महादु पोटे या नावाने वॉर्ड नं.३९ बिल नं.१७५ मालमत्ता क्र.Z४३९१२२६९९ हे दुसरे बिल येते. तरी बिल नं.१७५ कायम ठेउन बिल नं.१७५ रद्द करावे असे कळविले आहे.

महानगरपालिका परिशिष्ट अ पाहता बिल नं.१७५ वर भगवान महादु पोटे यांचे पत्रा बांधकाम क्षेत्र ८.७४ चौ.मी. दिसुन येते. पण सद्यस्थितीत या डिमांड बिलावर मिळकतीचे करयोग्य मुल्य काढण्याबाबतचा नमुना व संगणकास ३३.२३ चौ.मी. या क्षेत्रावर आकारणी झाल्याचे दिसुन येते व त्यांनी त्याप्रमाणे सर्व घरपटटी सन २०१९-२० अखेर पा.नं.AS/४८२३० दिनांक १६/११/२०१९ अन्वये रूपये ६२२०/- सपुर्ण भरणा केलेला आहे.

तसेच शोभा भगवान पोटे बिल क्र.१७६ यांचे मिळकतीचा परिशिष्ट अ पाहता बिल क्र.१७६ यांचे सिमेंट निवास किचन पत्रा शेड असे एकुण क्षेत्र ३१.२२ चौ.मी.दिसून येत आहे. त्यावर सदर मालमत्ता धारक यांनी २०१४/१५ अखेर पा.नं.AS/६३१७२ दिनांक ३०/०३/२०१५ अन्वये घरपटटी पाणीपटटीसह रूपये ४३९९८/- इतका भरणा केलेला आहे.

सदर मिळकतीचे विभाग प्रमुख समवेत प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर मालमत्ताधारक यांचा ७/१२ उतारा पाहिला असता सदर उता-यावर श्री. भगवान महादु पोटे यांचे नावावर मिळकत असून सदर मिळकतीचा वापर श्री भगवान महादु पोटे यांचे कुंटुंब करीत आहे. तसेच सदरच्या मिळकतीच्या बांधकामाचे प्रत्यक्ष मोजमाप घेतले असता बांधकाम आर सी सी बांधकामाचे क्षेत्र ३३.२३ चौ.मी. आहे. ३३.२३ चौ.मी. क्षेत्र हे बिल क्र.१७५ च्या परिशिष्ट अ वर नोंद घ्यावी लागेल व बिल क्र.१७५ चे क्षेत्रासह अ परिशिष्ट व डिमांड बिल रद्द करोव लागेल.

तथापी बिल क्र.१७६ च्या बिलामधील पाणीपटटी रूपये ८९१५/- बिल नं.१७५वर वर्ग करावी लागेल व बिल क्र.१७६ वरील घरपटटी व पाणीपटटी भरलेली रक्कम ४३९९८/- पैकी १६४६०/- पाणीपटटी ही सन २०१४-२०१५ अखेरची वजा करून भरलेली घरपटटी २७५३८/- (पाणीपटटी सोडून) चे बिल क्र.१७५ वर मायनस समायोजन करावे लागेल व बिल १७६ वरील उर्वरित घरपटटीची डिमांड सन २०१४-२०१५ नंतरची ३१/०३/२०२० अखेरची रक्क्म रूपये १२३२२/- वसुल न होणारी असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५२ अन्वये निर्लेखित करणेस तसेच परिशिष्ट अ रिव्हीजन रजिस्टर व संगणकावर नोंदी घेणेस सविनय आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे वसुली लिपिक / विभाग प्रमुख यांचा अहवाल असे

यावर प्रभाग समिती क्र.४ यांचा अभिप्राय की, वसुली लिपिक व विभाग प्रमुख यांनी प्रस्तावीत केलेनुसार पुढील कार्यवाहीस्तव सादर.

यावर सहाय्यक मुल्य निर्धारक तथा कर संकलन अधिकारी यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावीत केल्यानुसार वसुली वॉर्ड मधील ७/१२ उतारा पाहता भगवान माधव पोटे यांचे नावे मिळकत आहे सन २००३ मध्ये रिव्हीजन करतांना भगवान महादू पोटे यांचे नावे एक खोलीचे मोजमापे घेतली होती.परत त्याच मिळकतीचे शोभा भगवान पोटे नावाने नोंद घेउन कराची आकारणी केलेली आहे त्यामुळे एकाच मिळकतीचे दोन मागणी बिले येत आहे त्यातील जु.मा.क्र.१७५ वर कराचा भरणा करून आहे व १७६ वर कर भरणे पेंडीग आहे हे दोन एकाच असल्याने जु.मा.क्र. १७५ हा कायम ठेवुन १७६ रदद करणे आवश्यक आहे. सदर कर वसुल न होणारी असल्याने मा.स्थायी समितीच्या मान्यतेने कराची रक्कम निर्लेखित करणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणे विषयी आदेशार्थ सादर.

मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, १. एकाच मालमत्तेवर डबल कर आकारणी होत आहे., २. परंतु पाणी कर आकारणी बील क्र.१७६ वर होत आहे. ,३. त्यानुसार पाणी आकारणी किती भरली आहे ? किती थकबाकी आहे ? तसेच एकुण आज अखेर किती कर निर्लेखित करते आहे? निर्लेखित रकमेवर शास्ती किती आहे ? तक्ते जोडण्यात यावे.

यावर वसुली लिपिक व केडगाव विभाग प्रमुख यांची अभिप्राय की, फेरसादर मालमत्ता क्र.Z४३९२२७०० जुना बिल क्र.१७६ या मिळकतीवर पाणी आकारणी ही झालेली असुन त्यांनी सन २०१३-२०१४ अखेर रू.१६४६०/- पाणीपटटी भरली असुन पा.क्र.AS/६३१७२ दिनांक ३०/०३/२०१५अन्वये भरली असुन सोबत पावती जोडली आहे.

सदर मालमत्तेची पाणीपटटी रूपये ८९१५/- थकीत असुन ती पाणीपटटी बिल क्र.१८५ वर वर्ग करावयाची आहे. दिनांक ३१/०३/२०२० अखेर ६५३२/- कर व शास्ती रक्कम रू.८८८६/- एकुण १५,४१८/- करासहीत शास्ती निर्लेखित करावयाची आहे. सोबत तक्ता जोडण्यात आला आहे.तथापी सविनय आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांची अभिप्राय की, १. एकाच मालमत्तेची दोनदा आकारणी झाली आहे., २. आकारणी तक्ते सोबत जोडले आहेत.,३. फेरसादर नुसार कर रू.६५३२/- निर्लेखित करणेकामी मा.स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे., ४. शास्तीबाबत रू.८८८६/- मा.आयुक्त यांना नियम ५१ नुसार स्वेच्छाधित अधिकार आहेत. तथापी पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, चर्चा करा.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, चर्चेनुसार मान्य

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. भगवान महादू पोटे रा.आयोघ्या,केडगांव यांना प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. ३९ , बिल क्र. १७५ व १७६ एकाच मिळकतीचे दोन वेगवेगळी बीले येत असून मालमत्ता बील क्र.१७६ रद्द करून रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करणे बाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री.शाम नकळांडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. मुदस्सर शेख :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अर्जदार मालमत्ताधारक श्री. भगवान महादू पोटे रा.आयोघ्या,केडगांव यांना प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. ३९ , बिल क्र. १७५ व १७६ एकाच मिळकतीचे दोन वेगवेगळी बीले येत असून मालमत्ता बील क्र.१७६ रद्द करून रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अर्जदार मालमत्ताधारक श्री. भगवान महादू पोटे रा.आयोघ्या,केडगांव यांना प्रभाग समिती क्र. ४ वॉर्ड क्र. ३९ , बिल क्र. १७५ व १७६ एकाच मिळकतीचे दोन वेगवेगळी बीले येत असून मालमत्ता बील क्र.१७६ रद्द करून रक्कम व त्यावर आकारलेली शास्ती कराची रक्कम निर्लेखित करण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. मुदस्सर शेख सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ०९ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आयटीआय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना श्री. लखन नवनाथ कर्डीले व इतर १० यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ- १] आस्थापना कार्या-४/जा.क्र.३००४,३००५ व ३००६ दि. २९/११/२०१९ अन्वये कार्यालयीन आदेश

२] शिकाऊ उमेदवार श्री. लखन नवनाथ कर्डीले व इतर १० यांचे दि.२३/१०/२०२० चे विनंती अर्ज.

विषयांकित विनंती रिपोर्ट सादर की, संदर्भिय अर्जदार हे शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेतील विविध ठिकाणी इलेक्ट्रीशियन, पंप ऑपरेटर व प्लंबर या पदावर काम पहात होते. आमची कामाची मुदत संपुष्टात आलेली असून आम्ही महानगरपालिकेचे मानधन तत्वावर काम करण्यास इच्छुक असून आम्हास मानधन तत्वावर कामावर घेणेची विनंती केलेली आहे.

तसेच संदर्भ क्र. १ अन्वये शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत भरती सत्र डिसेंबर २०१९ शिकाऊ उमेदवार म्हणून इलेक्ट्रीशियन, पंप ऑपरेटर व प्लंबर या पदासाठी एक वर्षाच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आलेली होती व त्यानुसार आस्थापना विभागामार्फतच त्यांना नियमानुसार प्रतिमाह विद्यावेतन देण्यात येत आहे व सदरची एक वर्षाची नेमणूक दि.२८/११/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे.

| अ.नं. | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | कामाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री. लखन नवनाथ कर्डीले | इलेक्ट्रीशियन | वसंतटेकडी |
| २ | श्री. सुफियान इस्माईल सय्यद | इलेक्ट्रीशियन | आर.टी.ओ. |
| ३ | श्री. आजिनाथ बाबासाहेब शिंदे | इलेक्ट्रीशियन | विळद पंपीग स्टेशन |
| ४ | श्री. ज्ञानेश्वर झिने | प्लंबर | निर्मलनगर |
| ५ | श्री. भरत पांडुरंग शिंदे | पंप ऑपरेटर | बोल्हेगांव |
| ६ | श्री. विशाल कचरून जोरी | पंप ऑपरेटर | विळद पंपीग स्टेशन |
| ७ | श्री. अभिषेक पुरूषोत्तम गायकवाड | प्लंबर | सारसनगर |
| ८ | श्री. वैभव फसले | इलेक्ट्रीशियन | आगरकर मळा |
| ९ | श्री. किरण पाचारणे | इलेक्ट्रीशियन | विळद पंपीग स्टेशन |
| १० | श्री. महेश दरंदले | इलेक्ट्रीशियन | विळद पंपीग स्टेशन |
| ११ | श्री. सोमनाथ विलास शिंदे | प्लंबर | दिल्लीगेट |

या अनुषंगाने अहवाल सादर की, मागील काही वर्षापासून शहर पाणी पुरवठा योजनेसह शहर/उपनगर पाणी वितरण व्यवस्थेतील कार्यरत मोठया संख्येने कमी झालेले आहेत त्याचा परिणाम शहराच्या दैनंदिन पाणी वितरणावर विपरीत परिणाम होत आहे व कर्मचा-या अभावी वितरण व्यवस्थेची व दुरूस्ती कामाची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

अशा परिस्थितीत या विभागाकडून सेवानिवृत्त झालेले व काही अनुभवी कर्मचारी मानधनावर घेवुन व त्याच प्रमाणे आयटीआय कडील शिकाऊ उमेदवार यांचे मदतीने शहर पाणी वितरण व्यवस्था नियत्रीत करण्याचे कसोशिने प्रयत्न चालू आहेत.

त्यातच संदर्भिय नमूद आस्थापना विभागाने दिलेले एकुण ११ शिकाऊ उमेदवार / कर्मचारी यांची मुदत संपुष्टात आलेली आहे. वरील सर्व शिकाऊ उमेदवार प्रामाणीकपणे काम करत असल्याने सद्यस्थितीत त्यांचे जागी दुसरे पर्यायी कर्मचारी या विभागाकडे उपलब्ध नसल्याने दैनंदिन देखभाल दुरूस्तीचे कामात अडचणी निर्माण होणार आहेत.

सबब शिकाऊ उमेवार म्हणून आस्थापना विभागाकडून एक वर्षापुर्वी उपलब्ध करून दिलेले वरील सर्व शिकाऊ उमेदवार म्हणून चांगल्या प्रकारे काम करीत असल्याने त्यांना या विभागाकडे कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात कामावर घेण्याची या विभागाचे धोरण आहे.

परंतु अशा प्रकारे आय.टी.आय. शिकाऊ उमेदवार यांना कंत्राटी पध्दतीने मानधनावर घेतल्यास भविष्यात अहमदनगर महानगरपालिकेस अडचणी निर्माण होवू नये या दृष्टीने सदर प्रकरणी आस्थापना विभागाचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर चर्चेसाठी ठेवून मा. स्थायी समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहिल. तथापी आदेशार्थ सादर सविनय सादर.

येणेप्रमाणे वरिष्ठ लिपिक, शाखा अभियंता, शाखा अभियंता पाणी पुरवठा विभाग यांचा अहवाल असे.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, पाणीपुरवठा विभागामध्ये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांची जागी सन २००७ पासून म्हणजे सुमारे १३ वर्षामध्ये शहर पाणी पुरवठा योजनेवर कर्मचारी नेमणूक झाली नसल्याने (आस्थापन विभागामार्फत) सदर विभाग कार्यरभ ठेवणेसाठी तांत्रिक कर्मचारी यांची उपलब्धता अनिवार्य आहे.(आस्थापना विभागामार्फत कायम कर्मचारी यांची नेमणूक होउ पर्यत) तरी प्रस्तावीतनुसार मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर लेखापरिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासनाने निर्देशानुसार तसेच मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार कायम / कंत्राटी करारवर नेमणूक करताना विधीत कार्यपध्दती अवलवणे आवश्यक आहे. जेणे करून वर्तमान पत्रात जाहिरात देवुन तसेच जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचे कडून पात्र उमेदवाराच्या यादया मागवुन लेखी / तोंडी परिक्षेनंतर उमेदवाराची निवड करणे अपेक्षीत असताना पाणीपुरवठा विभाग परस्पर उमेदवाराच्या अर्जावर कार्यवाही करताना दिसुन येते. तरी या पुढे विहीत पध्दतीने भरती प्रक्रिया कडून नेमणूक करणेकामी आस्थापना विभागाचे अभिप्राय घेवून पुर्तता करण्यात यावी.

यावर आस्थापाना विभाग :- श्री. काकडे तात्काळ कार्यवाही करावी.

उपरोक्त प्रस्तावावरील मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे दिनांक ०८/०१/२०२१ रोजीच्या शेरांकनानुसार की, अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमास महाराष्ट्र शास, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्र.अमपा-२०१२/प्र.क्र.३०१ (भाग-१) /नवि-२५, मंत्रालय,मुंबई-३२ दि.०६ फेब्रुवारी २०१६ अन्वये अटी व शर्ती नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमामधील अटी क्र.१] मध्ये सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर नवीन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५%) असल्यास विहीत मार्गाने भरता येतील. असे नमुद केलेले आहे. सद्यस्थितीत अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनावरील खर्चाची टक्केवारी ही ७०% पेक्षा जास्त असल्याने सरळसेवने रिक्त पदांवरील विहीत पध्दतीने भरती प्रक्रिया राबविणेमध्ये अडचणी निर्माण झालेली आहे.

मा.महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.पदनिर्मिती २०१०/८४/१० प्र.क्र.११ विसु-१ मंत्रालय, मुंबई दि.२७/९/२०१० अन्वये व मा.महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनिर्मिती २०१३ प्र.क्र.११/१३ /विसु-१ मंत्रालय,मुंबई दि.२/२/२०१३ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. पदनिर्मिती २०१०/८४/१० प्र.क्र.११ विसु-१ मंत्रालय, मुंबई दिनांक २७/९/२०१० अन्वयेच्या नमूद

सुचनेनुसार स्वत: कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्याऐवजी, बाहययंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) करण्याचे पर्याय अवलंबावेत असे स्पष्टपणे सुचित केलेले आहे.

वरील मा.शासन निर्णयाच्या अनुषंगाने इकडील आस्थापना जा.क्र.५९६० दि.३१/१२/२०१६ अन्वये पत्र देवुन संबंधीत विभागास अंदाजपत्रकामध्ये त्या त्या विभागाने कार्यालयीन खर्च हा नवीन लेखाशिर्षक निर्माण करून त्यामध्ये आवश्यकत रकमेची तरतुद प्रस्तावीत करण्यात येवुन त्या त्या विभागानेच बाहययंत्रणेमार्फत (Outsourcing द्वारे) कार्यवाही करणेबाबत निर्देशित केलेले आहे. तसेच त्याबाबत मा.शासन निर्णय दि.२७/६/२०१०, दि.०२/०२/२००३ तसेच ०२/०८/२०१६ नुसार जा.क्र.आस्था.४८०५ दि.१५/०३/२०१९ व जा.क्र.आस्था.२९७५ दि.२८/११/२०१९ अन्वयेच्या कार्यालयीन परिपत्रकानुसार सर्व विभाग प्रमुख व शाखा प्रमुख यांना अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागातील सेवा अभिकर्त्यामार्फत बाहययंत्रणेद्वारे (Outsourcing ) राबविणे बाबतची कार्यवाही ही संबंधीत विभागानेच प्रस्तावीत करणेबाबत मा.आयुक्त यांनी परिपत्रकान्वये निर्देशित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये आस्थापना विभागावरील खर्चाची टक्केवारी ही विहीत मर्यादपेक्षा जादा असल्याने याबाबत वेळोवेळी लेखापरिक्षणामध्ये आस्थापनेवरील जादा झालेल्या खर्चाबाबत लेखापरिक्षण आक्षेप घेण्यात आलेले असून आस्थापना खर्च विहीत मर्यादेपेक्ष कमी करणेबाबत सुचित केलेले आहे. त्यामुळे आस्थापना विभागामार्फत संबंधीत शिकाऊ उमेदवार यांची तात्पुत्या स्वरूपात इलेक्ट्रीशियन, पंप ऑपरेटर व प्लंबर यापदी पाणीपुरवठा विभागामध्ये मानधनावर नियुक्तीबाबत कार्यवाही करणे संयुक्तीक होणार नाही.

तरी पाणी पुरवठा विभाग यांचे प्रस्तावामध्ये नमुद केलेले इलेक्ट्रीशियन, पंप ऑपरेटर व प्लंबर यापदी पाणी पुरवठा विभागास आवश्यकता असल्यास प्रस्तुत प्रकरणावरील मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे निर्देशानुसार पाणीपुरवठा विभागाने त्यांचे मार्फत मानधनावर नियुक्तीबाबत पुढील उचित कार्यवाही करणे आवश्यक होईल.

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, मुख्यलेखापरिक्षक कृपया उपरोक्त प्रमाणे मान्यतेस्तव सादर

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.लेखापरिक्षक हयाच्याशी झालेल्या चर्चेनुसार आस्थापना प्रमुख हयांचे अभिप्रायानुसार शिकाऊ उमेदवार यांची तात्पुरत्या स्वरूपात इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यापदी पाणीपुरवठा विभागामध्ये मानधनावर नियुक्तीबाबत कार्यवाही करणे संयुक्तीक होणार नाही . करीता पाणीपुरवठा विभाग प्रमुख प्रस्तुत प्रकरणी पाणीपुरवठा विभागाकडील शिकाऊ उमेदवार यांची प्रस्तुत प्रकरणी शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अंतर्गत माहे एप्रिल २०२० च्या भरती सत्राकरीता आस्थापना विभागामार्फत हया पुर्वी भरती करण्यत आली होती.सदर शिकाऊ उमेदवारांची दि.३१/१२/२०२० रोजी प्रशिक्षण कालावधी संपुष्टात आलेला आहे त्यामुळे सदरचे प्रशिक्षणार्थी कर्मचारी पाणी पुरवठा या विभागाकडे काम करण्यास इच्छुक असुन या विभागास तांत्रिक कर्मचारी वर्गाची निंतात आवश्यकता असून सदरची भरती प्रक्रियासाठी आस्थापना विभागामार्फत होणेस व सदरहु कर्मचारी यांना त्यांची प्रात्याक्षिक व तोंडी व लेखी मुल्यांकर करण्यात येवून आस्थापना विभागामार्फत कार्यवाही होणेस विनंती असे मत आहे. आदेशार्थ सविनय सादर.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालान्वॅय मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर)साहेब यांची अभिप्राय की, Standing ला पाठवा.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आयटीआय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना श्री. लखन नवनाथ कर्डीले व इतर १० यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेणेबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- आय.टी.आय कडून घेतले आहेत काय माहिती दया.

पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री. सातपुते :- आता मानधनावर घेत आहोत पुर्वी स्टायपेडवर घेतले होते.त्यांची मुदत संपली त्यांचे जागेवर आता कोणी नाही.कर्मचा-या अभावी मनपाचा पाणी पुरवठा विस्कळीत होईल याकरिता प्रस्तावातील सर्व कर्मचा-यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर घेण्यात यावे.

मा.सभापती साहेब :- प्रस्तावातील सर्व आय.टी.आय. स्टायपेंडवर असलेल्या कर्मचा-यांना प्रभागातील पाईप लाईनची माहिती असल्याने सर्व कर्मचा-यांना मानधनावर घेण्यात यावे. कर्मचा-या अभावी शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होणार नाही याची खबरदारी घेण्यात यावी.

मा.सौ. वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आयटीआय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना श्री. लखन नवनाथ कर्डीले व इतर १० यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका शिकाऊ उमेदवार म्हणून कार्यरत असलेले आयटीआय इलेक्ट्रीशियन ,पंप ऑपरेटर व प्लंबर यांना श्री. लखन नवनाथ कर्डीले व इतर १० यांना कंत्राटी स्वरूपात मानधनावर कामावर घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ.वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- १० गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी१] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड),२]स्वप्नाली प्रताप इंगावले यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहामहिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

सदंर्भ- कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र. कै.बा.दे.वा. ४७६ दि.०४/१२/२०२०चा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, कै. बाळासाहेब देशपांडे दवाखाना यांचेकडील जा.क्र. कै.बा.दे.वा.४७६ दि.०४/१२/२०२०अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड), २] स्वप्नाली प्रताप इंगावले यांची अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्ती कालावधी दि.२२/०५/२०२० ते २१/११/२०२० अखेर असुन सदरची मुदत ही दि.२२/११/२०१९ रोजी पासुन समाप्त होत असल्याने त्यांना तांत्रिक खंड देवुन दि.२५/११/२०२० पासून पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सदयस्थितीमध्ये जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक १५८५दि.०३/०७/२०२०अन्वये कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारिका यापदी १] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड) यांची रू.१०,४००/- व २] स्वप्नाली प्रताप इंगावले यांची रू.१३,०००/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.२२/०५/२०२०पासून सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात असुन सदरची मुदत ही दि.२१/११/२०२० रोजी पासून समाप्त झालेली आहे.

तरी वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधि.१९४९मधील कलम ५३च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १]मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड)यांची दरमहा रू.१०,४००/-,२]स्वप्नाली प्रताप इंगावले यांची रू.१३,०००/-या दरमहा मानधनावर अटी व शर्तीप्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.२५/११/२०२०पासून पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्नयुक्ती करणेबाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्वमंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्यलेखाधिकारी ,मा.मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांच्या अभिप्राय घेण्यात यावा.

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/८/२००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गीने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. असे नमूद केलेले आहे. प्रस्तावीत वायरमन पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन कडून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी१] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड),२]स्वप्नाली प्रताप इंगावले यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहामहिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

आस्थापना प्रमुख श्री. साबळे :- मुदत दि.२२/११/२०२० ला संपलेली आहे त्यांना तांत्रिक खंड देवुन पुर्ननियुक्ती बाबतचा प्रस्ताव आहे.

मा.सभापती साहेब :- सहा महिने पुर्ण होण्यापुर्वी प्रस्ताव सादर करावा. हया मुदतवाढीलाच ५ महिने झाले आहे. प्रशासकीय कार्यवाही करिता वेळ लागणार असल्याने आधीच सुरूवात करा.

मा.सौ. वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी१] मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड),२]स्वप्नाली प्रताप इंगावले यांची तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहामहिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधि.१९४९मधील कलम ५३च्या तरतुदीनुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात परिचारीका यापदी १]मोहीनी अशोक गुंजाळ (बेरड)यांची दरमहा रू.१०,४००/-,२]स्वप्नाली प्रताप इंगावले यांची रू.१३,०००/-या दरमहा मानधनावर अटी व शर्तीप्रमाणे तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.२५/११/२०२०पासून पुढील सहा महिन्याकरीता करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- ११ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी १] भालेराव संतोष छबु,२] आशिष रमेश शेलार,३] खान इम्रान आयुब यांची मानधनावर करारबध्द पध्दतीने नियुक्त्या करणे मुदतवाढीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

सदंर्भ- १] जा.क्र.पा.पु. कंत्राटी करारबध्द नेमणूक १४७ दि.१९/०६/२०२० अन्वये कार्यालयीन आदेश

२] श्री. आशिष रमेश शेलार व इतर २ कर्मचारी यांचा दि.०५/१२/२०२० रोजीचा विनंती अर्ज

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, संदर्भिय कार्यालयीन आदेशानुसार अहमदनगर महानगरपालिकेमध्ये पाणी पुरवठा अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार खालील नमूद कर्मचारी तांत्रिक हुददयाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात पदांवर दि.१९/६/२०२० रोजी पासून ६ महिन्याकरीता निर्देशीत अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

संदर्भिय आदेशातील पाणीपुरवठा विभागाकरीता नियुक्त केलेले सर्व कर्मचारी यांची अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवर खालील निर्देशीत ठिकाणी नेमणूक करण्यात आलेली होती. कंत्राटी करारानुसार नेमणूक केलेल्या कर्मचा-यांची मुदत दि.१८/१२/२०२०रोजी संपुष्टात आलेली असल्याने मुदतवाढ मिळणेकामी खालील नमूद कर्मचारी यांनी दि.५/११/२०२०रोजी इकडेस विनंती अर्ज दिलेला आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांचे नाव | हुददा | दरमहा मानधन रक्कम | नेमणूक ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | आशिष रमेश शेलार | तांत्रिक सहाय्यक | रू.१०,०००/- | पाणीपुरवठा विभाग |
| २ | इमरान आयुब खान | तांत्रिक सहाय्यक | रू.१०,०००/- | पाणीपुरवठा विभाग |
| ३ | संतोष छबु भालेराव | तांत्रिक सहाय्यक | रू.१०,०००/- | पाणीपुरवठा विभाग |

यास्तव पाणी पुरवठा विभागाकरीता मोठया प्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्कयता असल्याने कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वरील नमुद तांत्रिक हुददयाप्रमाणे वरील नमुद कर्मचा-यांना नियमानुसार तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन मुदतवाढ देणे अत्यंत गरजेचे आहे. तथापी आपले आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर./अ

येणेप्रमाणे वरीष्ठ लिपिक , शाखा अभियंता पाणीपुरवठा विभाग यांचा अहवाल असे.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, पाणीपुरवठा विभागामध्ये तांत्रिक कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने व कामाची व्याप्ती पाहता अहवालामध्ये नमूद तांत्रिक सहाय्यक यांना मा.स्थायी समितीचे मान्येतेस्तव प्रस्ताव मान्येतेस्तव सादर.

यावर लेखा परिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मुदत वाढीबाबत शासन निर्णय / परिपत्रक अथवा अधिनियमामधील तरतुद नमुद नाही. मा.शासन सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक एस आर वी २०१७ प्र.क्र.४५५/कार्या-१२ दि.९ फेब्रुवारी २०१८ नुसार सर्व पदावरील नियुक्ता विहीत मार्गाने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घेण्यात तसेच अंत्यत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या /अस्थायी नियुक्ता करावा लागल्या तर त्या संपुष्टात आणण्याची दक्षता घेण्यात यावी असे नमुद आहे विभागाने सदर शासन निर्णयाचे अवलोकन करून नियुक्ती /मुदत वाढीबाबत निर्णय घेणेत यावा.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, "अ" मधील तांत्रिक सहाय्यक पाणीपुरवठा यांना तीन दिवस तांत्रिक खंड देउन मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी १] भालेराव संतोष छबु,२] आशिष रमेश शेलार,३] खान इम्रान आयुब यांची मानधनावर करारबध्द पध्दतीने नियुक्त्या करणे मुदतवाढीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री. सातपुते :- हया कर्मचा-यांची पुर्ननियुक्तीची दुसरी टर्म आहे.

मा.श्री. शेख मुदस्सर :- वॉलमन किती आहेत गरज किती आहे. लोक घ्यावे लागतील.

पाणीपुरवठा विभाग प्रमुख श्री. सातपुते :- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून योजना नगरपालिकेकडे हस्तांतरीत झाली त्यावेळी १२९ कर्मचारी या योजनेवर कार्यरत होते त्यापैकी १०० कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. कर्मचा-यांची आवश्यक्ता आहे.

मा.सौ. वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा. सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- पाणीपुरवठा विभागामध्ये तांत्रिक कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने व कामाची व्याप्ती पाहता अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठाविभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी १] भालेराव संतोष छबु,२] आशिष रमेश शेलार,३] खान इम्रान आयुब यांची मानधनावर करारबध्द पध्दतीने नियुक्त्या करणे मुदतवाढीबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** पाणीपुरवठा विभागामध्ये तांत्रिक कर्मचारी वर्ग अपुरा असल्याने व कामाची व्याप्ती पाहता अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेकरीता कंत्राटी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात तांत्रिक सहाय्यक यापदी १] भालेराव संतोष छबु,२] आशिष रमेश शेलार,३] खान इम्रान आयुब यांची मानधनावर करारबध्द पध्दतीने नियुक्त्या करणे मुदतवाढीबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- १२ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड, २) मनिष कैलास सोनवणे, ३) सागर दिलीप जाधव, ४) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

सदंर्भ- पाणी पुरवठा विभाग यांचेकडील जा.क्र. ८४९ दि.०४/०२/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पाणीपुरवठा विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. ८४९ दि.०४/०२/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये पाणी पुरवठा विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १] संदिप प्रभाकर पुंड , २] मनिष कैलास सोनवणे ,३] सागर दिलीप जाधव ,४] गहिनीनाथ अंबादास मेने यांचा अटी व शर्ती नुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.१९/०२/२०२० ते १८/०८/२०२० अखेर सहा महिन्याकरीता असुन सदरची मुदत ही दि.१९/०८/२०२० रोजी पासुन समाप्त होणार असल्याने पाणी पुरवठा विभगामध्ये मोठयाप्रमाणात तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता असल्याने संबंधीताना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील नियुक्तीबाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

सदयस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.४३ दिनांक ०९/१०/२०२० अन्वयेच्या पारीत मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक २३५९ दि.१०/११/२०२० अन्वये पाणीपुरवठा विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १] संदिप प्रभाकर पुंड , २] मनिष कैलास सोनवणे ,३] सागर दिलीप जाधव ,४] गहिनीनाथ अंबादास मेने यांची रू.१४०००/- या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवून दिनांक १९/०२/२०२० पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असून सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.१९/०८/२०२० रोजी पासून समाप्त झालेली आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार पाणीपुरवठा विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

| अ.क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | संदिप प्रभाकर पुंड | विजतंत्री | १४,०००/- | पाणीपुरवठा विभाग |
| २ | मनिष कैलास सोनवणे | विजतंत्री | १४,०००/- | पाणीपुरवठा विभाग |
| ३ | सागर दिलीप जाधव | पंपचालक | १४,०००/- | पाणीपुरवठा विभाग |
| ४ | गहिनीनाथ अंबादास मेने | पंपचालक | १४,०००/- | पाणीपुरवठा विभाग |

येणेप्रमणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांच्या अभिप्राय घेण्यात यावा.

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५प्र.क्र.४७/०५/१२दि.२५/८/२००५मधील परिच्छेद ५मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गीने /माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. असे नमूद केलेले आहे.

प्रस्तावीत विजतंत्री व पंपचालक यापदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन कडून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार पुर्ननियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :-अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड, २) मनिष कैलास सोनवणे, ३) सागर दिलीप जाधव, ४) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- कामकाज चांगले आहे का?

पाणीपुरवठी विभाग प्रमुख श्री. सातपुते :- चांगले काम करतात.

मा.सभापती साहेब :- विषय मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड, २) मनिष कैलास सोनवणे, ३) सागर दिलीप जाधव, ४) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तावातील कर्मचा-यांची कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.१९/०८/२०२० रोजी पासून समाप्त झालेली आहे. मुदत समाप्त होवून देखील बराच कालावधी झाला आहे. पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड, २) मनिष कैलास सोनवणे, ३) सागर दिलीप जाधव, ४) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे याच सभेत पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्तीची मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड, २) मनिष कैलास सोनवणे, ३) सागर दिलीप जाधव, ४) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तावातील कर्मचा-यांची कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.१९/०८/२०२० रोजी पासून समाप्त झालेली आहे. मुदत समाप्त होवून देखील बराच कालावधी झाला आहे. पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात विजतंत्री व पंपचालक यापदी १) संदिप प्रभाकर पुंड, २) मनिष कैलास सोनवणे, ३) सागर दिलीप जाधव, ४) गहिनीनाथ अंबादास मेने यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे याच सभेत पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्तीप्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्तीची मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- १३ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

सदंर्भ- इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा.क्र.३६९ दि.१९/०१/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग ३६९ दि.१९/०१/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.२५/०८/२०२० ते २४/०२/२०२१ अखेर सहा महिन्याकरीता असुन सदरची मुदत ही दि.२५/०२/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सदयस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.५२ दिनांक ११/११/२०२० अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक ६४ दि.०८/०१/२०२१ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांची रू.१४,२५०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.२५/०८/२०२०पासून सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्तीची मुदत ही दि.२५/०२/२०२१ रोजी पासून समाप्त होणार आहे.

तरी इलेक्ट्रीक विभाग यांचे कडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन गायकवाड अरविंद शामराव यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्नयुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राया घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांच्या अभिप्राय घेण्यात यावा.

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/८/२००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गीने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. असे नमूद केलेले आहे. प्रस्तावीत वायरमन पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन कडून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री. शेख मुदस्सर :- इलेक्ट्रीक एलईडी टेंडरचा ठेकेदार कोर्टात गेले आहेत टेंडर रिकॉल करा.

मा.सभापती साहेब :- रिकॉल करा अजुन स्पर्धक येतील.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- पहिल्यांदा संधी दिली डेमो दिला नाही नेमके त्याचे इटेंशन काय आहे लोकांच्या संतापला सामोरे जावे लागते. मनपा लोकांच्या घरात दिवा बसवू शकत नाही. ही लाजीरवाणी गोष्ट आहे. तातडीने विषय घेवून सभा काढा.

मा.श्री. शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन गायकवाड अरविंद शामराव यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसारअहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी गायकवाड अरविंद शामराव यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
## मा. स्थायी समिती सभा क्र. ०१

विषय क्रमांक- १४ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकुर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

सदंर्भ- इलेक्ट्रीक विभाग यांचेकडील जा.क्र.३७० दि.१९/०१/२०२१ अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, इलेक्ट्रीक विभाग यांनी त्यांचेकडील जा.क्र. इलेक्ट्रीक विभाग ३७० दि.१९/०१/२०२१ अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये इलेक्ट्रीक विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.०६/१०/२०२० ते ०५/०४/२०२१ अखेर सहा महिन्याकरीता असुन सदरची मुदत ही दि.०६/०४/२०२१ रोजी पासुन समाप्त होणार असल्याने त्यांना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर पुर्ननियुक्ती करणेबाबत सुचित केलेले आहे.

सदयस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्र.५० दिनांक ११/११/२०२० अन्वयेच्या मान्यता पारीत ठरावानुसार जा.क्र.आस्था.करारबध्द नेमणूक ६३ दि.०८/०१/२०२१ अन्वये इलेक्ट्रीक विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांची रू.१४,२५०/- या दरमहा मानधनावर अटी व शर्ती प्रमाणे तांत्रिक खंड देवुन दि.०६/१०/२०२० पासून सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर नियुक्तीची मुदत ही दि.०६/०४/२०२१ रोजी पासून समाप्त होणार आहे.

तरी इलेक्ट्रीक विभाग यांचे कडील वरील संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन सय्यद इकबाल सुलेमान यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे रूपये १४,२५०/- या दरमहा मानधनावर करारबध्द पुर्नयुक्ती बाबतच्या प्रस्तावास मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयासाठी सादर करणे करीता मा.मुख्य लेखाधिकारी व मा. मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राया घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर./अ

येणेप्रमणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांच्या अभिप्राय घेण्यात यावा.

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्र.एस.आर.व्ही.-२००५ प्र.क्र.४७/०५/१२ दि.२५/८/२००५ मधील परिच्छेद ५ मध्ये सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गीने / माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहीत वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी. असे नमूद केलेले आहे. प्रस्तावात वायरमन पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकान्वये अवलोकन कडून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, "अ" मध्ये प्रस्तावीत केल्यानुसार मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.श्री.शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी तीन दिवसाच्या तांत्रिक खंड देवुन सय्यद इकबाल सुलेमान यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द पुर्नयुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टानुसार अहमदनगर महानगरपालिका इलेक्ट्रीक विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात वायरमन यापदी सय्यद इकबाल सुलेमान यांचा तांत्रिक खंड देवुन अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा. श्री. शाम नळकांडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- १५ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदननगर शहर पाणीपुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस मुदतवाढ मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग.

संदर्भ १. इकडील जा.क्र.शहर पा.पु.४५ दि.२०/०५/२०२० अन्वये आदेश.
२. इकडील जा.क्र.शहर पा.पु.४६ दि.२०/०५/२०२० अन्वये आदेश.
३. मा.स्थायी समिती सभा क्र.०१ विषय क्र.७ दि.२१/०७/२०२०अन्वये पारीत ठराव
४. श्री.शेख आफाक शेख अजीज ,सेवानिवृत्त फिटर पा.पु.विभाग व इतर १३ यांचे मुदतवाढ मिळणे बाबतचे विनंती अर्ज.

विनंती रिपोर्ट सादर की,अहमदनगर हशर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेची कर्मचा-यां अभावी अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण झालेली आहे.कारण दैनंदिन कामाचे स्वरूप विचारात घेता त्याकरीता असलेला तांत्रिक व अतांि कर्मचारी वर्ग अत्यंत कमी प्रमाणात आहे.त्यामुळे नागरीकांच्या प्राप्त दौनंदिन तक्रारींचा वेळेत निपटारा होत नाही.पर्यायाने शहरासाठी मुळाधरण येथून पाणी उपलब्ध होत आहे.ते पाणी वितरण करीत असतांना काही नागरी भागास अत्यल्प पाणी पुरवठा होत आहे.

त्यासाठी शहर पाणी योजनेसह वितरण व्यवस्थेतील सेवानिवृत्त/मयत झालेल्या कर्मचा-यांच्या नव्याने /पर्यायी कर्मचारी उपलब्ध करून देणे बाबत मा.आयुक्त /मा.उपायुक्त यांचे मान्यतेने यापूर्वी प्रस्तावाव्दारे आस्थापना विभागाकडे मागणी करण्यात आलेली आहे.परंतू आस्थापना विभागाकडून अद्यापर्यंत कर्मचारी मिळालेले नाहीत.त्यामुळे पाणी पुरवठा विषयक दैनंदिन तक्रारी वाढत जावून कर्मचा-या अभावी पाणी वितरण व्यवस्थेची व दुरूस्तीची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

त्यासाठी शहर पाणी योजनेसह वितरण व्यवस्थेतील सेवानिवृत्त तांत्रिक व अतांत्रिक कर्मचा-यांना मा.आयुक्त यांचे मान्यतेने मा.स्थायी समितीची मंजूर घेवून ६ महिन्याकरीता मानधनावर काम देण्यात येत आहे.

तद्नुसार मा.आयुक्त यांचे दि.१९/०५/२०२० रोजीचे प्रशासकीय मंजूरीने खाली नमुद कर्मचारी यांना मा.स्थायी समितीचे कार्योत्तर मंजूरीस अधिन राहून तांत्रिक खंड देवून संदर्भ क्र.१ व २ अन्वये आदेशानुसार दि.२०/०३/२०२० पासून ६ महिन्या करिता मानधनावर नेमणूक करण्यात आलेली होती.व केलेल्या नियुक्तीस मा.स्थायी समिती सभा क्र.१ विषय क्र.७ दि.२१/०७/२०२० अन्वये पारीत ठरावा नुसार केलेल्या नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी प्राप्त आहे.

संदर्भ क्र.१ व २ अन्वये केलेल्या नेमणूकीची मुदत दि.१९/०९/२०२० रोजी संपुष्टात आलेली असून संदर्भ क्र.४ अन्वये खालील नमूद अनुक्रमे १ ते १४ कर्मचा-यांनी मानधनावरील नेमणूकीस मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.या अनुषंगाने अहवाल सादर की,मानधनावरील नेमणूकीस असलेले खालील नमुद कर्मचारी यांची शहराचा पाणी पुरवठा सुरळीत ठेवणेच्या दृष्टीकोनातून व आस्थापना विभागाकडून नव्याने कर्मचारी उपलब्ध होईपर्यत या विभागास कर्मचा-यांची नितांत आवश्यता /गरज असल्यामुळे सदरचे कर्मचारी यांचेकडून त्यांचेकडील संदर्भिय नेमणूकीची मुदत संपल्या नंतरही त्यांचेकडून नियमितपणे काम करून घेण्यात येत आहे व त्याशिवाय या विभागास पर्याय नाही.

तद्नुसार या विभागा मार्फत तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणूकीस असलेले परंतू दि.१९/०९/२०२० रोजी मुदत संपल्यानंतर त्यांचेकडून करून घेत असलेल्या कर्मचा-यांचे नाव तात्पुरत्या स्वरूपातील पदनाम,त्यांना अदा करावयाचे दरमहा मानधन व कामा करित असलेले ठिकाण इत्यादी बाबतचा सविस्तर तपशिल खालिल प्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | सध्या कार्यरत असलेले ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | दशरथ भागाजी शिंदे | फिटर | १२,०००/- | शहर पाणीपुरवठा योजना मुख्य जलवाहीनी देखभाल व दुरूस्ती |
| २ | रावसाहेब सदाशिव झीने | बिगारी | १०,०००/- | मनपा हद्दीमध्ये पाईप लाईन दुरूस्ती करणे |
| ३ | गोरख रंगनाथ तेलोरे | विजतंत्री | १२,०००/- | विळद पंपींग स्टेशन,मेंन्टनन्स विभाग |
| ४ | शेख अफाक शेख अजिज | फिटर | १२,०००/- | मनपा शहर व उपनगर हद्दीमधील पाईप लाईन दुरूस्ती व देखभाल |
| ५ | गागरे साहेबराव भागाजी | फिल्टर ऑपरेटर / मदतनीस | १०,०००/- | जलशुध्दीकरण केंद्र विळद |
| ६ | देविदास माधवराव लेंडकर | पंप ऑपरेटर/ मदतनीस | १०,०००/- | विळद पंपींग स्टेशन ,पंप ऑपरेटर मदतनीस |
| ७ | बाळू लक्ष्मण फुलसौंदर | वॉलमन मदतनीस | १०,०००/- | सावेडी भागातील लक्ष्मीनगर ,सुर्यनगर, तवलेनगर इ.परिसराचे दैनंदिन पाणी वाटप |
| ८ | दिपक बाळू खताडे | बिगारी /वॉचमन | १०,०००/- | रिझर्ववायर पाण्याची टाकी येथे वॉचमन |
| ९ | शांताराम माधव पाचारणे | फिटर /मदतनीस | १०,०००/- | शहर पाणी पुरवठा योजना ,बोल्हेगांव,नागापुर जलवाहीनी देखभाल व दुरूस्ती |
| १० | धोंडीराम नामदेव कराळे | पंपऑपरेटर /मदतनीस | १०,०००/- | विळद पंपींग स्टेशन पंप ऑपरेटर मदतनीस |
| ११ | किशोर विठ्ठल शिंदे | वॉलमन मदतनीस | १०,०००/- | प्र.क्र.२ अंतर्गत भागाचे दैनंदिन पाणी वाटप नियंत्रीत ठेवणे |

यास्तवा कर्मचा-यां अभावी पाणी पुरवठा विभागाकडील दैनंदिन पाणी पुरवठा बाबतची निर्माण झालेली गंभीर परिस्थीती व त्यासाठी कर्मचा-यांची आवश्यकता इत्यादी बाबत वरील नमूद परिस्थितीचे अवलोकन करता वरील तक्त्यातील अनुक्रमे १ते १४ सेवानिवृत्त कर्मचारी यांना त्यांची पूर्वीची ६ महिन्या करिताची केलेली नेमणूक संपुष्टात आलेपासून म्हणजेच दि.१९/०९/२०२० पासून तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवून मुदतवाढ देवून कामावर घेणेस व नेमणूक करणेस व केलेल्या नेमणूकीस मा.स्थायी समितीची कायोत्तर मंजूरी घेणे संयुक्तीक राहील.

येणे प्रमाणे वरीष्ठ लिपीक,शाखा अभियंता यांचा अहवाल असे.

यावर पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की,पाणी पुरवठा विभागामध्ये सन २००७ पासून अदयाप पावेतो सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या जागी सुमारे १३ वर्षामध्ये शहर पाणी पुरवठा योजनेवर कर्मचारी नेमणूक झाली नसल्याने (आस्थापना विभागा मार्फत ) सदर विभाग कार्यरत ठेवणेसाठी तांत्रीक कर्मचारी यांची उपलब्धता अनिवार्य आहे.(आस्थापना विभागामार्फत कायम कर्मचारी यांची नेमणूक होई पर्यत )

तरी प्रस्तावानुसार मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की,मा.शासन ,सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २७१५/पा.क्र.१००/१३ दि.८ जानेवारी २०१६ मध्ये सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांचा सेवाकरार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेबाबत मार्गदर्शक सुचना तथा अटी व शर्ती नियमीत केलेल्या आहेत.सदर अटी व शर्ती मधील नमुद आदेशाप्रमाणे विभागाने कार्यवाही करणेस हरकत नसावी.उपरोक्त शासन निर्णयाती अट क्र.२ मध्ये करार पध्दतीने नेमणूक करतांना विहीत पध्दतीने जाहीरात देवून अर्ज मागवावेत आणी प्राप्त आर्जातुन पात्र उमेदवाराची सुची (Panel) तयार करावी असे नमुद आहे.प्रस्तावात नमुद सेवानिवृत्त कर्मचा-याच्या नियुक्या या सदर अटीनुसार करण्यात आलेल्या आहेत किंवा कसे ? याबाबत विभागाने खात्री करावी.अट क्र.९ नुसार सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी यांचे मानधन बाबत खात्री करावी.

यावर मा.उपायुक्त यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

---***---

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदननगर शहर पाणीपुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस मुदतवाढ मिळणेबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- कामकाज चांगले आहे का?

पाणीपुरवठी विभाग प्रमुख श्री. सातपुते :- चांगले काम करतात.

मा.सभापती साहेब :- विषय मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर पाणीपुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस मुदतवाढीस ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर शहर पाणीपुरवठा विभागाकडील सेवानिवृत्त झालेले तांत्रिक व अतांत्रिक कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस मुदतवाढीस ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

सभापती,

स्थायी समिती

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- १६ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामध्ये कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मेंकॅनिकल) यापदावर श्री. किरण सुरेश बल्लाळ यांना नियुक्ती मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पा.पु.विभाग

संदर्भ- श्री. किरण सुरेश बल्लाळ यांचे दिनांक ९/११/२०२० अन्वये विनंती अर्ज

विषयांकित बाबत श्री. किरण सुरेश बल्लाळ , कनिष्ठ अभियंता (मानधन) यांचे संदर्भिय विनंती अर्ज इकडेस प्राप्त असून सदर अर्जामध्ये मी पाणी पुरवठा विभागामध्ये कंत्राटी तत्वावर कनिष्ठ अभियंता या पदावर यापुर्वी काम केलेले आहे.

तसेच सध्या पाणी पुरवठा विभागात कनिष्ठ अभियंता या पदाची आवश्यकता आहे असे मला समजले. सदर दि.९/११/२०१२ ते २८/८/२०१५ या कालवधीमध्ये पाणीपुरवठा विभागामध्ये कंत्राटी तत्वावर कनिष्ठ अभियंता म्हणून कार्यरत होतो. अत्यंत बिकट असून आम्हाला कामाची गरज आहे. तरी आम्हाला पाणीपुरवठा विभागात कनिष्ठ यापदावर नियुक्ती आदेश मिळावेत त्यासाठी दि.९/११/२०२० ते २८/०२/२०१५ या कालावधीत महानगरपालिकेकडे काम केल्याचे प्रमाणपत्र सोबत जोडून विनंती केलेली आहे.

या अनुषंगाने अहवाल सादर की, पाणीपुरवठा विभागाकरिता तांत्रिक कर्मचा-यांची आवश्यकता विचारात घेउन सन २०१२ मध्ये आस्थापना विभागामार्फत एकुण १२ कनिष्ठ अभियंता यांची तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली होती. यामध्ये संदर्भिय अर्जदार यांचा समोवश होता.

सद्यस्थितीत पाणीपुरवठा विभागाकडे विभाग प्रमुखांचे अखत्यारीत श्री. गाडळकर जी.के. व श्री. रोहाकेले एस.टी. हे दोनच कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत व या विभागामार्फत दैनंदिन पाणी वितरण व्यवस्थापना शिवाय मा. केंद्र शासित अमृत अभियानाअंतर्गत पाणीपुरवठा योजना व भुयारी गटार योजना या दोन महत्वपुर्ण योजनांची कामे प्रगतीपथावर आहेत. व अभियंत्या अभावी दैनंदिन सह महत्वपुर्ण योजनांचे कामावर विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे या विभागाकरिता अभियंत्याची आवश्यकता आहे.

तसेच आस्थापना विभागामार्फत पाणी पुरवठा विभागाकरिता उपलब्ध करून दिलेल्या पैकी १. श्री. राहुल सदाशिव गिते कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल), २. श्री. प्रदिप सदाशिव ढगे कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल), व ३. सौ. स्नेहल राजेंद्र मुळे कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) हे तीनच अभियंते कार्यरत आहेत व त्यांना आस्थापना विभागामार्फत प्रत्येकी दरमहा रू.२५०००/- इतके मानधन अदा करण्यात येत आहे.

यास्तव विषयांकित बाबत संदर्भिय अर्जदार श्री. किरण सुरेश बल्लाळ यांची मागणी विचारात घेता कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदावर वरील नमूद तीन अभियंत्याच्या केलेल्या नेमणूकी प्रमाणे आस्थापना विभागाचा अभिप्राय घेवून सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर चर्चेसाठी ठेवून मा.स्थायी समितीच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे संयुक्तीक राहिल. तथापी आदेशार्थ सादर सविनय सादर.

येणेप्रमाणे वरिष्ठ लिपिक, शाखा अभियंता, शाखा अभियंता पाणीपुरवठा विभाग यांचा अहवाल असे.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, कल्याण रोड परिसरात दैनंदिनी देखभाल व पाणी वितरण वेळेत व नियोजन बध्द पध्दतीने होण्याच्या दृष्टीकोनातुन एक स्वंतत्र अभियंता नेमणेबाबत मा.आमदार साहेब यांनी दि.२९/१२/२०२० रोजी नागरिका समवेत व मनपा सर्व अभियंते व पाणी वाटप नियंत्रक व वॉलमन समवेत बैठक घेण्यात येवुन पाण्याचत सुधारणा करणेबाबत सक्त ताकीद देण्यात आली व नियोजनाबाबत मानधन अभियंता (माहितगार ) नेमणेस आदेशीत केलेनुसार व कामाच्या आवश्यकते प्रमाणे उपरोक्त प्रस्तावास मान्यता देणे योग्य वाटते.

यावर लेखा परिक्षक व मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा. शासनाचे निर्देशानुसार तसेच मनपा अधिनियमातील तरतुदीनुसार कायम / कंत्राटी करारावर नेमणूक करताना विहित कार्यपध्दती अंवलवणे आवश्यक आहे. जेणेकरून वर्तमान पत्रात जाहिरात देउन तसेच जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचेकडून पात्र उमेदवाराच्या यादया मागवुन लेखी/ तोंडी परिक्षे नंतर उमेदवारांची निवड करणे अपेक्षित असताना पाणीपुरवठा विभाग परस्पर उमेदवारांचया अर्जावर कार्यवाही प्रस्तावीत करताना दिसुन येते. तरी यापुढे विहीत पध्दतीने भरती प्रक्रिया करून नेमणूक करणे कामी आस्थापना विभागाचे अभिप्राय घेवुन पुर्तता करण्यात यावी.

यावर विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर उपरोक्त प्रस्तावात नमूद केलेनुसार सदर अभियंता हे शिवाजीनगर परिसराचा पाणीपुरवठा नियंत्रित करणेसाठी नेमणूक करणे आवश्यक आहे. सदर परिसराचा पणीपुरवठा सातत्याने विस्कळीत होत असल्याने नेमणूक करणे गरजेचे आहे. करिता मा.मुलेअ/ मुलेप यांनी नमूद केलेनुसार आस्थापना विभागाचा अभ्रिपाय घेवून पुढील कार्यवाहीस्तव सादर.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, सदर परिसरामध्ये पाणीपुरवठा ुसुरळीत व सुव्यवस्थित होण्यासाठी नियोजनाकरिता अस्तिवातील अभियंता संख्या फार अत्यल्य असल्याने मा.स्थायी समितीच्या मान्यतेने नेमणूकी साठी आदेशार्थ सादर.

यावर आस्थापना प्रमुख यांचा अभिप्राय की, याप्रमाणे कार्यवाही घ्यावी.

उपरोक्त प्रस्तावावरील मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे दिनांक ८/०१/२०२१ रोजीच्या शेरांकनानुसार की, अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारीत आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमास महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. अमपा-२०१२/ प्र.क्र.३०१ (भाग-१) नवि-२५ मंत्रालय मुंबई-३२ दि.०६ फेब्रुवारी २०१६ अन्वये अटी व शर्ती नुसार मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर आस्थापनेवरील पदांच्या सुधारित आकृतीबंध व सेवा प्रवेश नियमामधील अटी क्र. १) मध्ये सदर अटीची पुर्तता झाल्यानंतर नवीन आकृतीबंधामुळे उपलब्ध होणारी पदे आस्थापना खर्च विहीत मर्यादेत (३५%) असल्यास विहीत मार्गाने भरता येतील असे नमुद केलेले आहे. सद्यस्थितीत अहमदनगर महानगरपालिकेच्या आस्थापना वरील खर्चाची टक्केवारी ही ७०% पेक्षा जास्त असल्याने सरळसेवने रिक्त पदांवरील विहीत पध्दतीने भरती प्रक्रिया राबविणेमध्ये अडचणी निर्माण झालेली आहे.

यापुर्वी पाणीपुरवठा विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदी सहा महिन्याकरिता अटी व शर्ती नुसार मानधनावर करारबध्द नियुक्तीसाठी दिनांक ४/९/२०१२ रोजीच्या दैनिक सकाळ व सामना या वर्तमान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दीस देवुन थेट पध्दतीने कार्यवाही करण्यात आलेली होती. त्यानुषंगाने श्री. बल्लाळ किरण सुरेश यांची जा.क्र. आस्था. करारबध्द नेमणूक ८५२२ दिनांक ११/०३/२०१५ अन्वये तांत्रिक खंड देवुन दिनांक २७/०२/२०१५ पासून सहा महिन्याकरिता दरमहा मानधनावर अटी व शर्ती नुसार करारबध्द नियुक्ती करण्यात आलेली होती व सदरची मुदत ही यापुर्वीच समाप्त झालेली असुन श्री. बल्लाळ किरण सुरेश हे सद्यस्थितीमध्ये कार्यरत नाही श्री. बल्लाळ यांची मानधनावरील नियुक्तीस प्रदिर्घ कालावधी झालेला आहे.

मा. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनिर्मिती २०१०/८४/१० प्र.क्र.११ विसु-१ मंत्रालय, मुंबई दि.२७/९/२०१० अन्वये व मा. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनिर्मिती २०१३/१३/ विसु-१ मंत्रालय, मुंबई दि.०२/०२/२०१३ अन्वये व मा. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनिर्मिती २०१०/८४/१० प्र.क्र.११ विसु-१ मंत्रालय, मुंबई दि.२७/९/२०१० अन्वयेच्या नमुद सुचनेनुसार स्वत: कंत्राटी पध्दतीने नेमणूका करण्याऐवजी, बाहययंत्रणेकडून (Outsourcing द्वारे) करण्याचे पर्याय अवलंबावेत असे स्पष्टपणे सुचित केलेले आहे.

वरील मा.शासन निर्णयाच्या अनुषंगाने इकडील आस्थापना जा.क्र.५९६० दिनांक ३१/१२/२०१६ अन्वये पत्र देवुन संबंधित विभागास अंदाजपत्रकामध्ये त्या त्या विभागाने कार्यालयीन खर्च हा नवीन लेखाशिर्षक निर्माण करून त्यामध्ये आवश्यक रकमेची तरतुद प्रस्तावीत करण्यात येवुन त्या त्या विभागानेच बाहययंत्रणेमार्फत (Outsourcing द्वारे) कार्यवाही करणेबाबत निर्देशित केलेले आहे. तसेच त्याबाबत मा. शासन निर्णय दि.२७/०९/२०१०, दि.०२/०२/२००३ तसेच ०२/०८/२०१६ नुसार जा.क्र.आस्था.४७०५ कइ.१५/०३/२०१९ व जा.क्र.आस्था.२९७५ दि.२८/११/२०१९ अन्वयेच्या कार्यालयीन परिपत्रकानुसार सर्व विभाग प्रमुख व शाखा प्रमुख यांना अहमदनगर महानगरपालिकेमधील विविध विभागातील सेवा अभिकर्त्यामार्फत बाहययंत्रणेद्वारे (Outsourcing द्वारे) राबविणे बाबतची कार्यवाही ही संबंधीत विभागानेच प्रस्तावीत करणेबाबत मा.आयुक्त यांनी परिपत्रकान्वये निर्देशित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये आस्थापना विभागावरील खर्चाची टक्केवारी ही विहीत मर्यादेपेक्षा जादा असल्याने याबाबत वेळोवेळी लेखापरिक्षणामध्ये आस्थापनेवरील जादा झालेल्या खर्चाबाबत लेखापरिक्षकण आक्षेप घेण्यात आलेले असून आस्थापना खर्च विहीत मर्यादेपेक्षा कमी करणेबाबत सुचित केलेले आहे. त्यामुळे आस्थापना विभागामार्फत श्री. किरण सुरेश बल्लाळ यांची तात्पुरत्या स्वरूपात कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदी पाणीपुरवठा विभागामध्ये मानधनावर नियुक्तीबाबत कार्यवाही करणे संयुक्तीक होणार नाही./अ

तरी पाणी पुरवठा विभाग यांचे प्रस्तावामध्ये नमुद केलेले श्री. बल्लाळ किरण सुरेश यांची पाणीपुरवठा विभागास आवश्कता असल्यास प्रस्तुत प्रकरणावरील मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे निर्देशानुसार पाणीपुरवठा विभागाने त्यांचेमाफ्रत मानधनावर नियुक्तीबाबत पुढील उचित कार्यवाही करणे आवश्यक होईल./ब

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख याचां अहवाल असे.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त आस्थापना विभाग यांच्या रिपोर्टनुसार सदर बाबत मा.स्थायी समिती मध्ये निर्णय घेणेस्तव सादर करणे संयुक्तीक वाटते तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा. उपायुक्त (कर) यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, '"अ" व "ब" बाबत स्पष्टीकरण करते.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर, विषयांकित बाबत सादर प्रस्तावामध्ये कार्यवाही अनुषंगाने आस्थापना विभागाचा अभिप्राय मागविला असता त्यामध्ये आस्थापना विभागावरील खर्चाची टक्केवारी ही विहीत मर्यादेपेक्षा जादा असल्याने याबाबत वेळोवेळी लेखापरिक्षणामध्ये आस्थापनेवरील जादा झालेल्या खर्चाबाबत लेखापरिक्षण आक्षेप घेण्यात आलेले असून आस्थापना खर्च विहीत मर्यादेपेक्षा कमी करणे बाबत सुचित केलेले आहे. त्यामुळे आस्थापना विभगामाफ्रत श्री. किरण सुरेश बल्लाळ, कनिष्ठ अभियंता (मानधन) यापदी पाणी पुरवठा विभागामध्ये मानधनावर नियुक्ती बाबत कार्यवाही करणे संयुक्तीक होणार नाही असे नमुद आहे.

यानुसार फेरसादर की, विषयंकित कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदावर आस्थापना विभागामार्फत नेमणुक करणेचे नमुद नसुन पाणीपुरवठा विभागामार्फत नेमणूक करणेचे प्रस्तावीत आहे व संबंधीताचे मानधन "मानधन व विद्य वेतन (आस्थापना विभाग)" या लेखाशिर्षकातील तरतुदी मधून प्रस्तावीत करावे लागणार आहे.

तसेच मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे लेखाआक्षेपाचे अवलोकन केले असता विहीत पध्दतीने भरती प्रक्रिया राबवून कंत्राटी पध्दतीने नेमणुका करणे गरजेचे आहे.

त्यानुसार कर्मचा-यांची आवश्यक्ता विचारात घेवून या विभागामार्फत यंत्र अभियंता, स्थापत्य अभियंता वाहनचालक व सुरक्षा रक्षक बिगारी, फिटर , इलेक्ट्रीशियन व वायरमन इत्यादी कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे कामी निविदा प्रक्रिया राबिवणे बाबतची कार्यवाही प्रस्तावीत करण्यात आलेली आहे. तथापी सदर प्रक्रिया पुर्ण होउन प्रत्यक्षात कर्मचारी उपलब्ध होईपर्यत अवधी जाणार आहे.

परंतु सद्यस्थितीत या विभागाकडील तांत्रिक/ अतांत्रिक कर्मचा-यासह अभियंत्या अभावी अत्यंत दयनिय आवस्था निर्माण झालेली आहे. या सर्व बाबी विचारात घेवून पाणी वितरण व्यवस्था देखभाल व दुरूस्ती कामासाठी पुर्वानुीव असलेले श्री.किरण सुरेश बल्लाळ ,कनिष्ठ अभियंता(मानधन) यांची प्रभाग क्र.०२ अंतर्गत पाणी वितरण व्यवसथा देखभाल व दुरूस्ती कामासाठी कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरिता मा.स्थायी समितीच्या मंजुरीने नेमणूकी बाबत प्रस्तावीत करण्यात आलेले आहे.आदेशार्थ सादर सविनय सादर /अ

येणेप्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभागामध्ये कंत्राटी कनिष्ठ अभियंता (मेकॅनिकल) यापदावर श्री. किरण सुरेश बल्लाळ यांना नियुक्ती मिळणेबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- कामकाज चांगले आहे का?

पाणीपुरवठी विभाग प्रमुख श्री. सातपुते :- चांगले काम करतात.

मा.सभापती साहेब :- विषय मंजूर करण्यात यावा.

मा.श्री. शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.श्री.सचिन शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा या विभागाकडील तांत्रिक/ अतांत्रिक कर्मचा-यासह अभियंत्या अभावी अत्यंत दयनिय आवस्था निर्माण झालेली आहे. या सर्व बाबी विचारात घेवून पाणी वितरण व्यवस्था देखभाल व दुरूस्ती कामासाठी पुर्वानुभव असलेले श्री.किरण सुरेश बल्लाळ ,कनिष्ठ अभियंता (मानधन) यांची प्रभाग क्र.०२ अंतर्गत पाणी वितरण व्यवसथा देखभाल व दुरूस्ती कामासाठी कंत्राटी पध्दतीने यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्ती प्रमाणे मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा या विभागाकडील तांत्रिक/ अतांत्रिक कर्मचा-यासह अभियंत्या अभावी अत्यंत दयनिय आवस्था निर्माण झालेली आहे. या सर्व बाबी विचारात घेवून पाणी वितरण व्यवस्था देखभाल व दुरूस्ती कामासाठी पुर्वानुभव असलेले श्री.किरण सुरेश बल्लाळ ,कनिष्ठ अभियंता (मानधन) यांची प्रभाग क्र.०२ अंतर्गत पाणी वितरण व्यवसथा देखभाल व दुरूस्ती कामासाठी कंत्राटी पध्दतीने यांची पुढील सहा महिन्यांकरीता अटी व शर्तो प्रमाणे मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. शाम नळकंडे सही/-

अनुमोदक :- मा.श्री. सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- १७ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लावी दगडू यांचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा ऑफिस रिपोर्ट

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका आस्थापना विभाग

संदर्भ - आरोग्य विभाग यांचेकडेस जा.क्र. ११८३ दि.२९/१२/२०२० अन्वयेचा प्रस्ताव

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आरोग्य विभाग यांनी त्यांचेकडेस जा.क्र.११८३ दि.२९/१२/२०२०अन्वये प्रस्ताव सादर करून त्यामध्ये रक्तपेढी विभागाकरीता करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांचा अटी व शर्तीनुसार मानधनावरील पुर्ननियुक्तीचा कालावधी दि.३०/०६/२०२०ते२९/१२/२०२०अखेर सहा महिन्याकरिता असुन सदर मुदतही दि.३०/१२/२०२० रोजी पासुन समाप्त होत असल्याने संबंधीताना तीन दिवसाचा तांत्रिक खंड देवुन पुढील नियुक्ती बाबत नमुद करून सुचित केलेले आहे.

सद्यस्थितीमध्ये मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ४३ दिनांक ०९/१०/२०२० अन्वये पारित मंजुरी ठरावाच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था. करारबध्द नेमणुक २२८६ दि.०२/११/२०२० अन्वये रक्तपेढी विभागासाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांची रू.१६०००/- या दरमहा मानधनावर तांत्रिक खंड देवुन दि.३०/०६/२०२० पासून सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करण्यात आलेली असुन सदरच्या कालावधीतील केलेल्या करारबध्द मानधनावरील नियुक्तीची मुदत ही दि.३०/१२/२०२० रोजी पासुन समाप्त झालेली आहे.

तरी संदर्भिय अहवालाच्या अनुषंगाने व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमामधील कलम ५३ च्या तरतुदीनुसार रक्तपेढी विभागासाठी करारानुसार खालील तक्त्यात दर्शविलेल्या संबंधीतांची तात्पुरत्या स्वरूपात नमुद केलेल्या दरमहा मानधनावर त्यांना तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवुन पुढील सहा महिन्याकरीता अटी व शर्ती प्रमाणे करारबध्द पुर्ननियुक्ती करणेबाबत मा.स्थायी समितीची पुर्व मंजुरी मिळणेकामी निर्णयाकरिता सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविणेस मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

| अ.क्र. | नाव | तात्पुरत्या स्वरूपात पदनाम | दरमहा मानधन रक्कम | रूजू होण्याचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | मोरे पल्लवी दगडू | लॅब टेक्निशियन | १६,०००/- | रक्तपेढी विभाग |

येणेप्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा आवश्यक ते बाबत अभिप्राय घेण्यात यावा.

यावर वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की, रक्तपेढी विभागाकडील तंत्रज्ञ या कोवीड-१९ चाचण्यांकरिता तोफखाना दवाखाना येथे मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेने कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे रक्तपेढी सुरू करणेबाबतचा पत्रव्यवहार मा.सहाय्यक आयुक्त , अन्न व औषध प्रशासन, अ.नगर यांचेकडे केलेला आहे. या बाबींचा विचार करता मुदतवाढ केले उचित राहिल असे मत आहे.

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मुलेअ व मुलेप यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर लेखापरिक्षक /मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.शासन सामान्यप्रशासनविभाग शासन परि. क्र.एस.आर.व्ही.-२००५/प्र.क्र.४७/०५/१२दि.२५/८/२००५मधील परिच्छेद ५मध्ये"सर्व पदावरील नियुक्त्या विहीत मार्गाने/माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी.अंत्यत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या / अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्यातर त्या विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी"असे नमुद केले आहे.

प्रस्तावीत लॅब टेक्निशियन पदी पुढील मुदतवाढ देताना उपरोक्त शासन परिपत्रकाचे अवलोकन कडून उचित कार्यवाही करण्यात यावी.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, आरोग्य अधिकारी व मुलेप यांचे अभिप्राय नुसार सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समिती मान्यतेसाठी सादर करणेसाठी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त साहेब यांची अभिप्राय की, वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या अभिप्रायानुसार रक्तपेढी मधील कर्मचारी यांनी तोफखाना दवाखाना येथे काम केले असल्याबाबत नमुद असल्यामुळे पुर्ननियुक्ती बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लावी दगडू यांचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतचा प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सौ. वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लावी दगडू यांचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्तीबाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवेसाठी करारानुसार तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन यापदी मोरे पल्लवी दगडू यांचा तीन दिवसांचा तांत्रिक खंड देवून अटी व शर्ती प्रमाणे पुढील सहा महिन्याकरीता मानधनावर करारबध्द पुर्ननियुक्ती बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानमुते मंजूर

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- १८ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे उदयाने सुभोभिकरण करिता सामाजिक संस्था खाजगी कंपनी इतर जिजामाता उदयान, अप्पू हत्ती चौकातील नेहरू उदयान इतर देखील उदयाने बी.ओ.टी. तत्वावर मा.श्री.प्रकाश भागानगरे नगरसेवक यांना पत्रानुसार देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका उदयान विभाग

संदर्भ- १. मा.स्थायी समिती सभा क्र.५ विषय क्र. ९२ दि.१३/११/२०१९
२. मा.श्री. प्रकाश भागानगरे ,नगरसेवक यांचे पत्र दि.१५/०१/२०२१

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येत आहे की, उदयान विभागामार्फत महानगरपालिका हद्दीमध्ये उदयानांचे देखभाल ,दुरूस्ती करण्यात येत असते.

तथापी १.अहमदनगर महानगरपालिकेतील उदयान विभागाकडील कर्मचा-यांची संख्या अपुरी असल्याने
२. उदयानांची देखभाल, दुरूस्ती , विदयुत खर्च इत्यादी सुविधाचा अभाव
३. उदयानांमध्ये होणारे अतिक्रमण

उपरोक्त बाबींचा विचार करता अहमदनगर महानगरपालिकेस उदयानांबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे संदर्भीय क्र.१ च्या ठराव नुसार महानगरपालिकेचे काही उदयाने बी.ओ.टी. तत्वावर (खाजगीकरणांचे माध्यमातुन) ना नफा ना तोटा या धर्तीवर देण्याबाबत ठराव करण्यात आलेला आहे.

त्यापैकी गंगा उदयान, महालक्ष्मीउदयान , सिध्दीबाग उदयान खाजगी तत्वावर देणेकामी निविदा प्रसिध्द केलेली आहे त्यामध्ये गंगा उदयान व महालक्ष्मी उदयानांचे प्रस्ताव अंतिम टप्प्यात आहेत.

कै. बाळासाहेब देशपांडे उदयानास (सिध्दीबाग) निविदा प्राप्त न झालेने मुदतवाढ देणे आवश्यक आहे त्याकरिता मुदतवाढ मिळावी ही विनंती.

संदर्भिय क्र.२ च्या मागणी पत्रानुसार जिजामाता उदयान आनंदधाम समोर सुशोभिकरणांची मागणी केलेली आहे त्यांचे मागणी नुसार जिजामाता उदयानांच ना नफा न तोटा या तत्वावर अथवा सामाजिक खाजगी संस्था/ कंपनी / काररखाना इत्यादी यांचेकडून महानगरपालिकेच्या अटी, शर्तीस अधिन राहुन सदर उदयाना सुशोभिकरणाकरिता देणेस हरकत वाटत नाही तत्पुर्वी सदर उदयान सुशोभिकरणा करण्यासाठी देणे करिता मा.स्थायी समितीची मंजुरी देणे आवश्यक वाटते.

तसेच जिजामाता उदयानाप्रमाणे पंडीत नेहरू उदयाना , अप्पु हत्ती चौक हे उदयान देखील सुशोभिकरण करण्याकरिता खाजगी संस्था / कंपनी / काररखाना इत्यादी संस्थेस देणेस हरकत नाही त्याकरिता ही मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे./अ

येणेप्रमणे उदयान विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्य

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे उदयाने सुभोभिकरण करिता सामाजिक संस्था खाजगी कंपनी इतर जिजामाता उदयान, अप्पू हत्ती चौकातील नेहरू उदयान इतर देखील उदयाने बी.ओ.टी. तत्वावर मा.श्री.प्रकाश भागानगरे नगरसेवक यांना पत्रानुसार देणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- म.सा.आनंदऋषी महाराज समाधी दर्शना करीता देशभरातुन लोक येतात.या परिसरामध्ये महानगरपालिकेचे उद्यान आहे.त्याठिकाणी देखभाल होत नाही. त्याठिकाणी बेकायदेशीर गोष्ट घडत असतात.सदरचे उदयान मे.चंगेडीया आउट डोअर ॲड.प्रा.ली. ही संस्था स्वखर्चाने याठिकाणी सध्या अस्तीस्वात असलेल्या महादेव मंदिराचे पावित्र राखण्याकरीता लागणा-या सर्व उपाययोजना ही संस्था करणार आहे.तसेच आनंदधाम कडील बाजू कडील भाग बंद करून या ठिकाणी म.सा.आनंदऋषी महाराज समाधीशी निगडीत एखादी वास्तु उभारून सुशोभिकरण करण्यास देखील संस्था तयार असल्याने या संस्थेस महानगरपालिकेचे जिजामाता उदयान विकसीत करण्यास बी.ओ.टी.तत्वावर दयावे.

मा.सभापती साहेब :-कालच भारतीय जैन संघटनेचे श्री.आदेश चंगेडीया यांचा फोन आला होता. चांगले सुशोभिकरण करू असे ते म्हटले त्याची देखभाल चांगल्या पध्दतीने होणार असेल तर दयायला हरकत नाही. अशाच पध्दतीने इतरही ओपनस्पेस घ्यावेत.ब-याच ठिकाणी उदयानात गार्डनचे कर्मचारी भेटत नाही.

मा.सभापती साहेब :- मंजूर करावे.

मा.श्री.शाम नळकांडे :- आपल्या शहरात भरपूर ठिकाणी कच-याचे ढिग झाले आहेत

मा.श्री. मनोज कोतकर :- केडगाव परिसरात कोरोना ने अवघड परिस्थिती निर्माण झाली आहे केडगावला लवकरात लवकर कोव्हीड सेंटर सुरू करावे. (फोनवरून संपर्क )

मा.उपायुक्त(कर)श्री.डांगे :- डॉन बास्को कोवीड सेंटर ६०बेडचे आहे. इतर ठिकाणी जागा उपलब्ध करून दिली तर करता येईल.

मा.श्री.मनोज कोतकर :- कोवीड सेंटरसाठी जागा उपलब्ध करून देतो. पाण्याची समस्या निर्माण आली आहे. श्री. निकम साहेब, श्री. सातपुते यांचे आभार केडगाव पाणी प्रश्न उपस्थित झाला तो सुरळीत केला तर बरे होईल.

मा.श्री. निकम :- ठिक आहे.

मा.श्री. मनोज कोतकर :- लाईटसाठी नगरसेवकांनी फटके खायचे बाकी राहिले आहे. एलईडी निविदाबाबत एक निर्णय घेवून पर्याय काढा लाईटचा प्रश्न मार्गी लावा.

मा.सभापती साहेब :- आपण निर्णय घेत आहोत.

मा.श्री. शाम नळकांडे :- माझ्या प्रभागात संध्याकाळी ८ वा कच-याचा ढिग उचलला.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- आम्ही कोरोना नियोजनात व्यस्त असल्याने लक्ष देता आले नाही. तुम्ही सांगा कुठे कुठे ढिग आहेत ते उचलून घेवू.

मा.श्री.शाम नळकांडे :- अमरधाम, गांधी मैदान, मेवाडाजनगर मधील कचरा रात्री उचलला दररोज सकाळी ११ वाजेपर्यत कचरा उचलायला पाहिजे कचरा गाडी जाते मग ढिग होतो कसा.

मा.सभापती साहेब :- कोरोना काळ आहे. संबंधीतांना सुचना करा.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- उदयापासून दिसणार नाही.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- कोरोना पेंशट ॲडमिटसाठी प्रॉब्लेम येत आहेत. बेड उपलब्ध होत नाही. कोरोनासाठी हेल्पलाईन प्रसिध्द करा. किती बेड शिल्लक आहे, ऑक्झीजन बेड किती आहे, याची माहिती दयावी.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- २३४३६२२, २३४०५२२ हे दोन संपर्क नंबर दिले आहेत.

मा.सभापती साहेब :- कार्पोरेट ग्रुपवर नंबर एस.एम.एस. टाका.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- मला पण याबाबतीत फोन येतात.

मा.सभापती साहेब :- लसी करणची माहिती दया, कमी पडले आहे. शासनाच्या गाईड लाईन काय आहेत.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- महानगरपालिकेच्या ७ नागरी आरोग्य केंद्र १० खाजगी ठिकाणी लसीकरण चालू आहे. डि.एच.ओ.कडून लसीचा स्टॅाक येतो. तसा आपण वितरीत करतो.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- प्रोफेसर कॉलनी केंद्रात हाल होतात. सोमवार, मंगळवार ,बुधवार केविशिल्ड लस लस देतो. गुरूवार, शुक्रवार, शनिवार कोव्हॉक्सीन लस देतो. दोन्ही स्टॅाक आहे.

मा.श्री. रविंद्र बारस्कर :- नागरिक कोवॅसीन लस नको असे का म्हणतात.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- तसे काही नाही.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ७ केंद्रावर ॲन्टीजन करतो, RTPCR करतो,महात्मा फुले माळीवाडा दवाखाना या ठिकाणी आम्ही पाहिले प्रंचड गर्दी होते. कुठल्याही प्रकारे सोशन डिस्टन सिंगचे पालन होत नाही. जादा फैलाव याच्यातुन होतो. यावर नियोजन केले पाहिजे. त्या ठिकाणी बॅरेकेटिंग केले पाहिजे.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- दोन पार्टीशन करा. एक व्हॅकसीन व एक टेस्टींगसाठी करणार. ५० खुर्च्या ठेवणार आहेत. टोकन सिस्टीम त्याठिकाणी राबवणार त्यामुळे भविष्यात गर्दी होणार नाही. वैयक्तीक भेटी घेतल्या टाईमींगचे नियोजन करीत आहोत.

मा.श्री. प्रकाश भागानगरे : हेल्थपोस्टचे हेडचे फोन नंबर नगरसेवकांना दया.

मा.सभापती साहेब :- माथाडी कामगार अत्यावश्यक सेवेत काम करतात कामगांरासाठी तपासणी व लसीकरणाची व्यवस्था करावी जागा आम्ही उपलब्ध करून देतो.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- लसीकरणासाठी जवळचे केंद्र जोडून देवू. कोव्हीड सेंटर बाबत माहिती दिली.

मा.श्री. शेख मुदस्सर :- नटराज हॅाटेल कोवीड सेंटर जवळ कृष्णा एनक्लेव्ह रहिवासी इमारत शेजारीच आहे त्या ठिकाणी पार्टीशन मारले पाहिजे.

मा.उपायुक्त (कर) श्री. डांगे :- ५० ऑक्सीजन कॉन्सट्रेटर मशीन घेत आहोत.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- नविन सेंटर कोठे उभारत आहोत.

मा.उपायुक्त (कर) श्री. डांगे :- नविन सेंटर मिलीटरी होस्टेल, काकासाहेब म्हस्के होमीओपॅथि कॉलेज, नगर कॉलेज, बडीसाजन ,मंगल कार्यालय, एम्स हॉस्पीटल, पटेल मंगल कार्यालय इ.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑक्सीजनची व्यवस्था करावी.

मा.उपायुक्त (कर) श्री. डांगे :- खाजगी हॉस्पीटलमध्ये जादा वेतन मिळत असल्याने तिकडे कर्मचारी जातात त्यामुळे कर्मचारी उपलब्ध होत नाही. मानधनावर घेवू. असतील तर सांगा.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- मे.चंगेडीया आउट डोअर ॲड.प्रा.ली.या संस्थेस जिजामाता उद्यान सुशोभिकरण करणे देखभाल दुरूस्ती करणे करीता ११ वर्षा करीता देण्यास मान्यता देण्यात यावी.

मा.श्री.शाम नळकांडे :- महादेव मंदिराचे पावित्र राखणे व उदयानाची निगा राखण्याकरीता मे.चंगेडीया आउट डोअर ॲड.प्रा.ली. या संस्थेस ११ वर्षा करीता देण्यात यावी.

मा सभापती सहेब :- आनंदधाम परिसरातील जिजामाता उद्यान विकसीत करणे व आनंदधाम कडील बाजू बंद करून या ठिकाणी म.सा.आनंदऋषी महाराज समाधीशी निगडीत एखादी वास्तु उभारून सुशोभिकरण करण्यास मे.चंगेडीया आउट डोअर ॲड.प्रा.ली. मान्यता देण्यात येत आहे तसेच उद्यान विकसीत करणे व मंदिराचे पावित्र राखण्याकरीता होणारा खर्च ही संस्था करणार आहे.व कोणत्याही प्रकारे प्रवेश फि नागरीकांकडून आकारणार नाहीत किंवा इतर उद्याना प्रमाणे उत्पन्न मिळविणार नाहीत.त्यामुळे त्यांना या ठिकाणी असलेल्या मंदिराचे पावित्र राखले जाईल व उदयानास बाधा होणार नाही या अटी, शर्तीस अधिन राहुन विनामोबदला संस्थेची जाहिरात करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेच्या आनंदधाम परिसरातील जिजामाता उद्यान विकसीत करणे व आनंदधाम कडील बाजू बंद करून या ठिकाणी म.सा.आनंदऋषी महाराज समाधीशी निगडीत एखादी वास्तु उभारून सुशोभिकरण करण्यास मे.चंगेडीया आउट डोअर ॲड.प्रा.ली. यांना ११ वर्षा करीता देण्यास व उद्यान विकसीत करणे व मंदिराचे पावित्र राखण्याकरीता होणारा खर्च ही संस्था करणार आहे.व कोणत्याही प्रकारे प्रवेश फि नागरीकांकडून आकारणार नाहीत किंवा इतर उद्याना प्रमाणे उत्पन्न मिळविणार नाहीत.त्यामुळे त्यांना या ठिकाणी असलेल्या मंदिराचे पावित्र राखले जाईल व उदयानास बाधा होणार नाही या अटी, शर्तीस अधिन राहुन विनामोबदला संस्थेस जाहिरात करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही/-

अनुमोदक :- मा.श्री.शाम नळकांडे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>सभापती<br>स्थायी समिती<br>अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- १९ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अर्जदार नगरसेवक/नगरसेविका श्री.उमेश खंडेराव कवडे, सौ. सोनाली अजय चितळे ,सौ. सुवर्णाताई संजय गेनप्पा,श्री. नरेंद्र कुलकर्णी , श्री. सुभाष लोंढे यांचे पत्रानुसार प्रभाग क्र.२ मध्ये विवेकानंद चौक गुजर गल्ली येथील शितळादेवी पटांगण येथील व्यायाम शाळेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका क्रीडा विभाग

अर्जदार :- मा.नगरसेवक व मा.नगरसेविका

१. श्री. उमेश खंडेराव कवडे, २. सौ. सोनाली अजय चितळे,

३. सौ. सुवर्णताई संजय गेनप्पा तसेच १. सौ. सोनाली अजय चितळे,

२. श्री. नरेंद्र कुलकर्णी , ३. श्री. सुभाष लोंढे यांचे इकडील कार्यालयाकडील प्राप्त पत्र

वरील विषयांकित प्रभाग क्र .२ मध्ये विवेकानंद चौक, गुजर गल्ली येथील शितळादेवी मैदानातील महानगरपालिकीची व्यायामशाळा आहे. यामधून योग्य ते उत्पन्नाची हमी निश्चित मिळेल या बाबत ही व्यायामशाळा योग्य अटी व शर्तीने भाडेतत्वावर चालवण्यास देण्याबाबत मा.नगरसेवक व मा. नगरसेविका १] श्री. उमेश खंडेराव कवडे, २] सौ.सोनाली अजय चितळे ,३] सौ. सुवर्णताई संजय गेनप्पा यांनी इकडील कार्यालयाकडे पत्र दिले आहे.

तसेच मा.नगरसेवक व मा.नगरसेविका १. सौ. सोनाली अजय चितळे , २. श्री. नरेंद्र कुलर्णी ,३. श्री. सुभाष लोंढे यांनी या भागातील नागरिकांशी चर्चा केली असता सर्व नागरिक या व्यायाम शाळे बाबत अत्यंत समाधानी आहेत तसेच हा परिसर अत्यंत गजबजलेला लोकवस्तीचा परिसर असल्यामुळे अत्यंत छोटया अरूंद बोळया आहेत. दुचाकी वाहने या भागात लवकर जावू शकत नाहीत.त्यामुळे तेथील रहिवाशी नागरिकांनी व्यायामशाळा खाजगीकरण करण्यास देवू नये अशी मागणी केली आहे. तरी आपणास विनंती की, व्यायामशाळेची इमारत अत्यंत सुस्थितीत असुन व्यायामशाळा उत्तमरित्या चालू आहे व भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात येवु नये अशी विनंती केली आहे.

वरील ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी केली असता कोव्हीडच्या संक्रमणामुळे व शासनाच्या आदेशानुसार ही व्यायामशाळा गेल्या ८-९ महिने बंद ठेवण्यात आली होती व्यायामशाळा अत्यंत स्वच्छता ,टापटीप व उत्तमरित्या चालु आहे. सदर व्यायामशाळा ही अत्यंत गरजबजेल्या रहिवाशी निवासामधील आहे व या व्यायामशाळेला देखभाल करण्यासाठी पालिकेमार्फत कर्मचारी नियुक्ती नसल्याने स्थानिक नागरिकच या व्यायामशाळेची देखभाल व स्वच्छता राखतात ही व्यायामशाळा सकाळी ६.०० ते ९.०० पर्यत अशी चालू असते व्यायामशाळा भाडयाने दिल्यास या परिसरातील रहिवासी,नागरिक ,जेष्ठ नागरिक तरूण व लहान मुले या व्यायामशाळेचा अत्यंत चांगल्याप्रकारे उपयोग करतात. याबाबत कुठल्याही रहिवाशी नागरिकांची तक्रार नाही.

तरी वरील मा.नगरसेवक व मा.नगरसेविका यांचे पत्रांचे विचार करून सदर व्यायामशाळा ही भाडेतत्वार द्यावी किंवा कसे याबाबत आपले मार्गदर्शन मिळावे तसेच भाडेतत्वावर चालविण्यांस देण्याचे झाल्याचे पुढील कार्यवाही करीता बांधकाम विभागास आदेश होणेस सदरचा रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर./अ

येणेप्रमाणे क्रीडा विभाग लिपिक यांचा अहवाल असे.

यावर मा.सहाय्यक आयुक्त(कर) यांचा अभिप्राय की,प्रस्तावीत"अ" प्रमाणे मार्गदर्शनार्थ सविनय सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समिती निर्णय घेणेस सक्षम आहे.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मा.स्थायी समितीच्या निर्णयासाठी दयावी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अर्जदार नगरसेवक/नगरसेविका श्री.उमेश खंडेराव कवडे, सौ. सोनाली अजच चितळे ,सौ. सुवर्णाताई संजय गेनप्पा,श्री. नरेंद्र कुलकर्णी , श्री. सुभाष लोंढे यांचे पत्रानुसार प्रभाग क्र.२ मध्ये विवेकानंद चौक गुजर गल्ली येथील शितळादेवी पटांगण येथील व्यायाम शाळेबाबतचा प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

क्रीडा विभाग श्री.फिलीप्स - ऑफिस रिपोर्टचे वाचन केले.

मा.श्री.शेख मुदस्सर :- सध्या महानगरपालिका मेंटेनन्स करते का.

क्रीडा विभाग श्री.फिलीप्स :- तेथील स्थानिक नागरीक पाहतात.

मा.सभापती साहेब :- नागरीक व्यवस्था पाहत असतील सुस्थितीत असेल तर द्यायची गरज नाही.

मा.श्री.शेख मुदस्सर :- महानगरपालिकेने सांभाळावी कोरोना नंतर कर्मचारी उपलब्ध करुन द्या.

मा.सभापती साहेब :- चालवायला देवू नका,

या व्यवस्थित आहे.

क्रीडा विभाग श्री.फिलीप्स :- जिल्हा क्रीडा कार्यालयाकडून जिम साहित्य मिळणार आहे. दोन सदस्यांनी पत्र दिले आहे. सर्व खर्च त्यांचा असेल काही साधने देणार आहे. फक्त स्थायीचा ठराव लागतो मनपा निधी देत नाही.

मा.श्री.शेख मुदस्सर :- अशाच प्रकारे अजुन काही विषय असतील तर ते घ्या.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- प्रशासनाला विचारा.

मा.सभापती साहेब :- अनेक विषय परत येणार आहेत.

क्रीडा विभाग श्री.फिलीप्स :-हा विषय मंजूर करा, म्हणजे आपल्याला प्रोसिजर करता येईल.बाकीचे पण ॲड करा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध प्रभागातील मंजुर रेखांकनातील खुल्या जागा सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या मनपाच्या मालकीच्या जागा व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मा.जिल्हा क्रीडा अधिकारी यांना कळविण्यात यावे. पुढचे जे येतील ते याच ठरावात घ्या. मंजूर करा.

क्रीडा विभाग श्री.फिलीप्स :- मा.स्थायी समितीची विषय पत्रिका प्रसिध्द झाल्यानंतर मनपा हद्दीतील प्रभाग समिती क्र. २ व ४ मध्ये मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत व्यायाम साहित्य मिळणेबाबतची संचिका मा.आयुक्त साहेब यांची स्वाक्षरी होवून नगरसचिव विभागाकडे पाठविली आहे. मा.सदस्यांच्या मागणी नुसार सदरचा विषय याच सभेमध्ये मंजूर करावा ही विनंती.

मा.श्री.मुदस्सर शेख :- मा.सभापती साहेब व सर्व सदस्यांना मनपा हद्दीतील प्रभाग क्र. १,२,३,४,५,६,७,८,११,१२,१३,१४,१५,१६ व १७ मध्ये मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत व्यायाम साहित्य मिळणे , नवीन व्यायाम शाळा बांधणे , बास्केटबॉल मैदान विकसीत करणे , हॉलीबॉल मैदान विकसीत करणे , कबड्डी मैदान विकसीत करणे , ओपन जीम विकसीत करणे इ. वरील प्रभागातील खुल्या जागा व बंदिस्थ जागेमध्ये व्यायाम साहित्य वरील प्रभागातील जागेवर उपरोक्त क्रीडा साहित्या करीता महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार नसल्याने वरील प्रभागातील नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उददेशाने सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या मनपाच्या मालकीच्या जागे मध्ये व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मा.स्थायी समिती ची मान्यते बाबतचा ठराव जिल्हा क्रीडा अधिकारी यांना पाठविण्यात यावा.

मा.श्री. समद खान :- महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार नसल्याने प्रभागातील नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उददेशाने सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या मंजुर रेखांकनातील मनपाच्या मालकीच्या असलेल्या खुल्या जागे मध्ये व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मा.जिल्हा क्रीडा अधिकारी यांना कळविणेस मान्यता देण्यात यावी.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्र.२ मध्ये विवेकानंद चौक गुजर गल्ली येथील शितळादेवी पटांगण येथील व्यायाम शाळेबाबतचा ऑफिस रिपोर्ट बाबत व्यायामशाळेची इमारत अत्यंत सुस्थितीत असुन व्यायामशाळा उत्तमरित्या चालू आहे व भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात येवु नये.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मनपा हद्दीतील प्रभाग क्र. १,२,३,४,५,६,७,८,११,१२,१३,१४,१५,१६ व १७ मध्ये मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत व्यायाम साहित्य मिळणे , नवीन व्यायाम शाळा बांधणे , बास्केटबॉल मैदान विकसीत करणे , हॉलीबॉल मैदान विकसीत करणे , कबड्डी मैदान विकसीत करणे , ओपन जीम विकसीत करणे इ. वरील प्रभागातील खुल्या जागा व बंदिस्थ जागेमध्ये व्यायाम साहित्य बसविणेस तसेच मनपा हद्दीतील प्रभाग समिती क्र. २ व ४ मधील प्र.स.क्र. २ मध्ये मनपा सर्व्हे क्र.३३/१ ३४+ ३५ विद्या कॉलनी , कल्याण रोड, अहमदनगर , मनपा सर्व्हे क्र.३०/२/२+३१/३ पावन म्हसोबा नगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर, २ मनपा सर्व्हे क्र. ३६/१ सुयोग पार्क, कल्याण रोड, अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.१४/१ आनंद पार्क, ओपन स्पेस मध्ये कल्याण रोड , अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.२१ रिया पार्क, स्वामी समर्थ केंद्र जवळ कल्याण रोड , अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.२३४ भावनाऋष्जी सोसायटी, कल्याण रोड, अहमदनगर , मनपा सर्व्हे क्र.२३५, वंदे मातर्‌म पार्क , कल्याण रोड अहमदनगर व प्र.स.क्र. ४ मध्ये मनपा सर्व्हे क्र.६०/१२३, साईदिप कॉलनी, स्टेशन रोड, अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.७३/२, संभाजी कॉलनी जवळ, स्टेशन रोड, वरील प्रभागातील जागेवर उपरोक्त क्रीडा साहित्या करीता महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार नसल्याने वरील प्रभागातील नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उददेशाने सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या मनपाच्या मालकीच्या जागे मध्ये व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मान्यता देण्यात येत आहे व वरील सर्व प्रस्ताव तयार करून जिल्हा क्रीडा अधिकारी यांना पाठविण्यास हि सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** प्रभाग क्र.२ मध्ये विवेकानंद चौक गुजर गल्ली येथील शितळादेवी पटांगण येथील व्यायाम शाळेबाबतचा ऑफिस रिपोर्ट बाबत व्यायामशाळेची इमारत अत्यंत सुस्थितीत असुन व्यायामशाळा उत्तमरित्या चालू आहे व भाडेतत्वावर चालविण्यास देण्यात येवु नये.

सभेमध्ये झालेल्या चर्चे नुसार मनपा हद्दीतील प्रभाग क्र. १,२,३,४,५,६,७,८,११,१२,१३,१४,१५,१६ व १७ मध्ये मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत व्यायाम साहित्य मिळणे , नवीन व्यायाम शाळा बांधणे , बास्केटबॉल मैदान विकसीत करणे , हॉलीबॉल मैदान विकसीत करणे , कबड्डी मैदान विकसीत करणे , ओपन जीम विकसीत करणे इ. वरील प्रभागातील खुल्या जागा व बंदिस्थ जागेमध्ये व्यायाम साहित्य बसविणेस तसेच मनपा हद्दीतील प्रभाग समिती क्र. २ व ४ मधील प्र.स.क्र. २ मध्ये मनपा सर्व्हे क्र.३३/१ ३४+ ३५ विद्या कॉलनी , कल्याण रोड, अहमदनगर , मनपा सर्व्हे क्र.३०/२/२+३१/३ पावन म्हसोबा नगर जवळ, कल्याण रोड, अहमदनगर, २ मनपा सर्व्हे क्र. ३६/१ सुयोग पार्क, कल्याण रोड, अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.१४/१ आनंद पार्क, ओपन स्पेस मध्ये कल्याण रोड , अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.२१ रिया पार्क, स्वामी समर्थ केंद्र जवळ कल्याण रोड , अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.२३४ भावनाऋष्जी सोसायटी, कल्याण रोड, अहमदनगर , मनपा सर्व्हे क्र.२३५, वंदे मातर्‌म पार्क , कल्याण रोड अहमदनगर व प्र.स.क्र. ४ मध्ये मनपा सर्व्हे क्र.६०/१२३, साईदिप कॉलनी, स्टेशन रोड,

अहमदनगर, मनपा सर्व्हे क्र.७३/२, संभाजी कॉलनी जवळ, स्टेशन रोड, वरील प्रभागातील जागेवर उपरोक्त क्रीडा साहित्या करीता महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भुर्दंड पडणार नसल्याने वरील प्रभागातील नागरिकांमध्ये व्यायामाची आवड निर्माण व्हावी या उददेशाने सध्या कोणत्याही वापरात नसलेल्या मनपाच्या मालकीच्या जागे मध्ये व्यायाम साहित्य बसविणे व मैदाने विकसीत करणे करीता मान्यता देण्यात येत आहे व वरील सर्व प्रस्ताव तयार करून जिल्हा क्रीडा अधिकारी यांना पाठविण्यास हि सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.मुदस्सर शेख सही /-

अनुमोदक :- मा.श्री.समद खान सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- २० गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरिता तांत्रिक / अतांत्रिक कर्मचा-यासह अभियंते उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे कामी निविदा प्रसिध्द करणेस मंजुरी मिळणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभाग

संदर्भ- मा.आयुक्त यांची दि.२०/०२/२०२१ रोजीची मान्यता / निर्देश

विनंती रिपोर्ट फेरसादर की, अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणीपुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरीता कार्यरत असलेला तांत्रिक / अतांत्रिक कर्मचारी वर्ग मोठया संख्याने कमी झालेले आहेत. त्याचा परिणाम शहराच्या दैनंदिन पाणी वितरणावर विपरीत परिणाम होत आहे व कर्मचा-या अभावी वितरण व्यवस्थेची व दुरूस्ती कामाची अत्यंत गंभीर समस्या निर्माण झालेली आहे.

त्यासाठी शहर पाणी पुरवठा योजनेसह सर्व प्रभागाकरिता खालीलप्रमाणे तांत्रिक / अंतांत्रिक कर्मचारी कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणेकामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणेबाबत सादर प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.२६/०२/२०२१ अन्वये प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

| अ. नं. | पदाचा तपशिल | प्रभाग क्र.१ | प्रभाग क्र.२ | प्रभाग क्र.३ | प्रभाग क्र.४ | शहर पाणी पुरवठा योजना |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्हॉलमन /मदतनीस | २ | १ | १ | ३ | |
| २ | इलेक्ट्रीशियन | १ | १ | २ | १ | १४ |
| ३ | पंपचालक | | | | | १९ |
| ४ | खोदाई करिता मजूर | ६ | ३ | ३ | ५ | २६ |
| ५ | सुपरवायझर | | | | १ | |
| ६ | फिटर | २ | ० | १ | १ | |

तसेच याच अनुषंगाने मा.आयुक्त यांचेशी दि.२६/०२/२०२१ रोजी समक्षात झालेल्या चर्चेनुसार पाणीपुरवठा विभागाकडील दैनंदिन देखभाल व दुरूस्तीसाठी बिगारी ,फिटर, इलेक्ट्रीशियन व वायरमन इत्यादी कामगार कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणेसह पाणी पुरवठा विभागामार्फत अमृत अभियाअंतर्गत चालू असलेल्या भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजनांचे कामासाठी इतर आवश्यक पदांवरील कर्मचारी स्वरूपात उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे कामी अपेक्षित खर्चासह सविस्तर प्रस्ताव सादर करणेबाबत मा.आयुक्त साहेब यांनी निर्देश दिलेले आहेत.

तद्नुसार जिल्हा दर सुची नुसार अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.नं. | पदाचा तपशील | पद संख्या | प्रति दिन प्रति कर्मचारी खर्च | दरमहा अपेक्षित खर्च रूपये |
|---|---|---|---|---|
| १ | यंत्र अभियंता | ४ | १०००/- | १,२०,०००/- |
| २ | स्थापत्य / अभियंता | ४ | १०००/- | १,२०,०००/- |
| ३ | व्हॉलमन / मदतनीस | ७ | ७००/- | १,४७,०००/- |
| ४ | इलेक्ट्रीशियन | १५ | ७५०/- | ३,३७,५००/- |
| ५ | पंपचालक | १५ | ७५०/- | ३,३७,५००/- |
| ६ | मजूर | ३५ | ७००/- | ७,३५,०००/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | सुपरवायझर | ०१ | ७५०/- | २२,५००/- |
| ८ | फिटर | ०४ | ७५०/- | ९०,०००/- |
| ९ | वाहनचालक (जड) | ०२ | ७५०/- | ४५,०००/- |
| १० | सुरक्षा रक्षक | २० | ६००/- | ३,६०,०००/- |
| ११ | लिपिक / टंकलेखक | २ | ७५०/- | ४५,०००/- |
| | **एकुण पदे** | **१०९** | **एकुण खर्च रूपये** | **२३,५९,५००/-** |

यास्तव वरिल सर्व बाबीचे अवलोकन नुसार पाणी पुरवठा विभागाकडील दैनदिन देखभाल व दुरूस्तीसाठी बिगारी, फिटर, इलेक्ट्रीशियन व वायरमन इत्यादी कामगार कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणेसह पाणीपुरवठा विभागामार्फत अमृत अभियानाअंतर्गत चालू असलेल्या भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजनांचे कामासाठी इतर आवश्यक पदांवरील कर्मचारी म्हणजेच यंत्र अभियंता, स्थापत्य अभियंता वाहनचालक व सुरक्षा रक्षक इत्यादी कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे कामी दरमहा रक्कम रू.२३,५९,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

तसेच सदर कामी येणारा खर्च हा सन २०२१-२०२२ या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकामध्ये "कार्यालयीन खर्च (बाहययंत्रणा)" या लेखाशिर्षका करिता प्रस्तावीत तरतुद रक्कम रू. २.०० कोटी मधून करता येणार आहे.

तरी प्रस्तावीत प्रमाणे अपेक्षित खर्चास व कामास प्रशासकीय मंजुरी मिळावी. तसेच सदर कामी सोबत जोडलेला ई-निविदा मसुदा प्रसिध्द करणेस मान्यतेस्तव तथापी आदेशार्थ सादर.

येणेप्रमाणे वरिष्ठ लिपिक यांचा अहवाल असे.

यावर मा.पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त मा.आयुक्त साहेब यांच्या मान्यतेनुसार व वेळोवेळी मा. महासभा , मा.स्थायी समिती बैठक व विविध मिटींग मध्ये झालेल्या चर्चा व आदेशान्वये खाजगी संस्था / ठेकेदार यांच्या मार्फत उपरोक्त निविदाद्वारे (कर्मचारी साठी) मागविणेस मान्यतेस्तव सादर.

यावर लेखा परिक्षक / मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, किमान वेतन अधिनियमील तरतुदीनुसार किमान वेतन विचारात घेउुन प्रस्तावीत केल्याप्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा सहमती दर्शक स्वाक्षरी

यावर मा.आयुक्त साहेब यांची सदर प्रस्तावास मा.स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता आहे अगर कसे ?

यावर मा.पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, फेरसादर, मा.मुख्य लेखाधिकारी यांचेशी उपरोक्त प्रस्तावाबाबत विचारणा केली असता सदर कामाची निविदा मागविणे व खर्चास / कामास मान्यतेस्तव मा.स्थायी समितीची मान्यता घेणेबाबत आदेशित केलेले आहे. तरी सदर प्रस्ताव मा.स्थायी समितीकडे मान्यतेस्तव पाठविणेस मान्यता मिळावी ही विनंती./अ

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, "अ" प्रमाणे

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**<u>चर्चा :-</u>**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा योजनेसह वितरण व्यवस्थेकरिता तांत्रिक / अतांत्रिक कर्मचा-यासह अभियंते उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करणे कामी निविदा प्रसिध्द करणेस मंजुरी मिळणेबाबतचा विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

मा.सभापती साहेब :- सविस्तर माहिती द्या.

श्री.सातपुते, इंजिनियर :- पाणी पुरवठा विभागामध्ये योजना ताब्यात घेताना १२९ कर्मचारी होते त्यापैकी १०० सेवानिवृत्त झाले आहेत. सध्या २९-३० कर्मचारी आहेत. ९-१० मानधनावर घेत आहोत. ५-६ बिगारी खोदकामासाठी आहेत. इतर विभागाकडून कर्मचारी मिळाले नाही. बदली आदेश झालेपण त्यापैकी काही मेडीकल रजेवर गेले. मा.जिल्हाधिकारी यांचेकडे चार्ज असतांना खाजगी तत्वावर कर्मचारी घेण्याबाबत सूचना होत्या. त्यानुसार प्रस्ताव केला आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- शहराची लोकसंख्या वाढली पण कर्मचारी त्या प्रमाणात उपलब्ध होत नाही. रात्री २ वाजेपर्यंत फोन येतात. पाणी कमी आहे. वितरण व्यवस्थेत दोष आहेत. काय नेमके कारण आहे. श्री. निकम साहेबांनी सांगितले शहरात आवश्यकतो पाणीपुरवठा उपलब्ध होतो मग हे कशामुळे कमी येते पाणी टाक्या त्याच आहेत.

मेकॅनिकल इंजि. श्री.निकम :- शहरात टाक्यात जे पाणी येते ते व्यवस्थीत रित्या उपलब्ध आहे. साठवण क्षमता व कर्मचारी यामुळे नियंत्रणाबाहेर गेली आहे. कर्मचारी मिळाले तर उपलब्ध पाणी सर्वांना समप्रमाणात देता येईल. योजनेवर व्यवस्था १२९ कर्मचारी हस्तांतरीत करुन घेतले. पण आज ३० कर्मचारी कार्यरत आहेत. , ७-८ फिटर व त्यांचे हाताखाली ८-१० कर्मचारी होते.पुर्वी नगरपालिका असताना तक्रार लगेच सोडवायचो. पाणीपुरवठा कडे प्रलंबित तक्रारी लगेच सोडवायाचो कर्मचा-या क्षमावी विलंब होतो. हेडवॉलमन नाही. चार झोनला इंजिनियर नाही. शहराचा विस्तार वाढला आहे. पाणी पुरवठा विभागाकडे नवीन योजना आल्या तेथे ही तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नाहीत.

मा.सभापती साहेब :- कर्मचा-यांचे कामानुसार नियोजन केले आहे काय.

मेकॅनिकल इंजि. श्री.निकम :- फिटर, इंजिनियर, सुरक्षा रक्षक व इतर आवश्यक पदा बाबत माहिती दिली. ऑफिस रिपोर्ट मध्ये उल्लेख आहे.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- पाणी कमी नाही आताच असे सांगीतले आहे. सामान्य नागरीक फोन करतात. तुमचा अनुभव आहे. शहराचा पाणी प्रश्न सुरळीत करण्यासाठी लागणा-या यंत्रणेसाठी मागणी करावी आम्ही देवू. पण पाणी पुरवठा सुरळीत करा. व्हॉलमनच्या मिटींग घ्या. त्यांना व्यवस्थीत बोलणे बाबत सूचनाला द्याव्यात.

मा.सभापती साहेब :- कामचूकार कर्मचा-यांना सस्पेंड करा. आम्ही मिटींग घेतली आहे. सूचना दिल्या आहेत.

मा.श्री.शाम नळकांडे :- १०९ पद भरणार आहोत. कल्याण रोडचा पाणी प्रश्न सुधारला पाहीजे. १० ची मोटार लावली पण ती मंगळवारी बंद होती.

मेकॅनिकल इंजि. श्री.निकम :- नगरसेवक महोदयांनी पलीकडच्या सेक्शनला लावून द्यायला सांगीतली होती त्यामुळे ती काढुन ठेवली होती. पुन्हा चालू केली.

मा.श्री.शाम नळकांडे :- नगरसेवकांच्या म्हणण्याने जर मोटार काढली. आम्हीही टाकीवर जावून काम बंद करायचे का. १३-१४ दिवस कल्याण रोडला पाणी भेटत नाही. कल्याण रोडचा गांभीर्याने विचार करावा.

मा.सभापती साहेब :- ८-१० लिकेज काढले. पाणी पुरवठा जोपर्यंत सुरळीत होत नाही. तोपर्यंत आढावा बैठक घेण्यांत येईल. लवकरात लवकर कल्याण रोड सहीत सर्वांना पाणी कसे देता येईल ते करा. जास्त कर्मचारी घेवू नका. अनावश्यक घेवू नका.

मा.सौ. वंदना ताठे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सौ. सोनाबाई शिंदे :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभागाकडील दैनंदिन देखभाल व दुरूस्तीसाठी बिगारी, फिटर, इलेक्ट्रीशियन व वायरमन इत्यादी कामगार कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणेसह पाणीपुरवठा विभागामार्फत अमृत अभियानाअंतर्गत चालू असलेल्या भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजनांचे कामासाठी इतर आवश्यक पदांवरील कर्मचारी म्हणजेच यंत्र अभियंता, स्थापत्य अभियंता वाहनचालक व सुरक्षा रक्षक इत्यादी कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करण्यास व याकामी निविदा प्रसिध्द करणेस तसेच येणा-या अपेक्षित खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील दैनंदिन देखभाल व दुरूस्तीसाठी बिगारी, फिटर, इलेक्ट्रीशियन व वायरमन इत्यादी कामगार कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणेसह पाणीपुरवठा विभागामार्फत अमृत अभियानाअंतर्गत चालू असलेल्या भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजनांचे कामासाठी इतर आवश्यक पदांवरील कर्मचारी म्हणजेच यंत्र अभियंता, स्थापत्य अभियंता वाहनचालक व सुरक्षा रक्षक इत्यादी कंत्राटी स्वरूपात उपलब्ध करणे कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करण्यास व याकामी निविदा प्रसिध्द करणेस तसेच येणा-या अपेक्षित खर्चास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. वंदना ताठे सही/-

अनुमोदक :- मा.सौ. सोनाबाई शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- २१ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** मा. जिल्हा न्यायालयीन इमारतीची महानगरपालिकेची पाणीपटटी शास्ती कमी करणेबाबतचा ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** अहमदनगर महानगरपालिका पाणीपुरवठा विभाग

संदर्भ- १. जिल्हा न्यायालय, अहमदनगर यांचे दि.१०/०२/२०२१ रोजीचे पत्र / ई -मेल

२. मा.स्थायी समिती सभा क्रमांक-०८ दि.०१/०९/२०१२ चा ठराव

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट की, जिल्हा न्यायाधीश-३ व अति.सत्र न्यायाधीरा अहमदनगर यांना नवीन न्यायालयीन इमारीकरिता अहमदनगर महानगरपालिकेकडून दोन इंची दोन पाण्याचे कनेक्शन मिटर पध्दतीने देण्यात आलेले आहे. सदर कनेक्शनची सन २०१९-२०२० ची पाणीपटटी बील पाठविले आलेले आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे पाणीपटटी आकारणेत आलेली आहे.

| अ.क्र. | तपशिल | बिल | व्याज / विलंब | एकुण |
|---|---|---|---|---|
| १ | उपविभागीय अभियंता बांध उपविभाग न्यायाधीश बंगला क्र.१ | ४४१६ | ३६७ | ४७८३ |
| २ | उपविभागीय अभियंता बांध उपविभाग न्यायाधीश बंगला क्र. २ | २२३१ | १७६ | २४०७ |
| ३ | उपविभागीय अभियंता बांध उपविभाग न्यायाधीश बंगला क्र. ३ | १८६० | १३२ | १९९२ |
| ४ | उपविभागीय अभियंता बांध उपविभाग जिल्हा न्यायाधीश बंगला क्र. ४ अति सत्र | ९०९१ | ९४३ | १००३४ |
| ५ | उपविभागीय अभियंता बांध उपविभाग जिल्हा न्यायाधीश बंगला क्र. ४ अति सत्र | २४७० | २८९ | २७५९ |
| | | **२००६८/-** | **१९०७** | **२१,९७५/-** |

सदरच्या दोन पाणीपटटी बीलामध्ये शास्ती आकारणेत आलेली आहे. कोषागार कार्यालयीने सदरच्या बीलामध्ये शास्ती आकारणेत आल्यामुळे बीलामध्ये आक्षेप नोंदविणेत आलेले आहे. त्यामुळे बील मंजुर करता येत नाही. पाणीपटटी बीलामध्ये लावणेत आलेली शास्ती कमी करणे यावी अशी इकडेस मागणी केलेली आहे.

या अनुषंगाने सादर की, अहमदनगर महानगरपालिकेमार्फत जिल्हा न्यायालय अहमदनगर येथील मा.जिल्हा न्यायाधीश- ३ व मा.अति. सत्र न्यायाधीश अहमदनगर यांना वरील नळ कनेक्शन द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे व मनपा कडून दरमहा पाणी बीले कार्यालयास देण्यात येत आहेत. तसेच संगणक प्रणाली अंतर्गत दरमहा बील जनरेट केल्यावर देयक दिनांकाच्या आत नळ धारकाने बील भरणे अनिवार्य आहे. परंतु संबंधीतानाकडून निधी उपलब्धतेनुसार भरणा केला जात असल्याने बीलाच्या देय दिनांकाप्रमाणे भरणा होत नाही. त्यामुळे संगणक प्रणाली मध्ये सदर पाणी बीलाचा दरमहाची पाणी बीलाच्या थकबाकीवर दरमहा १.५% व्याजाची आकारणी होत आहे.

शासकीय स्थानिक स्वराज्य संस्था यांचेकडील थकबाकी वरील व्याज / विलंब आकार प्रदान करण्याची तरतुद नसल्याने व्याज / विलंब आकार क्षमापित करणे विषयी संबंधीतांनी विनंती अर्ज केलेला आहे.

परंतु याच अनुषंगाने मा.स्थायी समिती सभा क्र.८ दि.१/९/२०१२ अन्वये पारित ठरावानुसार मुळा पंपीग स्टेशन ते वसंतटेकडी पर्यत पाणी आणण्याकामी महानगरपालिकेस वीज बीलांचा मोठया प्रमाणात खर्च येतो. याबाबत महानगरपालिकेस कुठलीही सवलत मा. शासन देत नाही. तसेच महानगरपालिकेच्या आर्थिक हिताशी

ही बाब निगडीत असल्याने होणारे आर्थिक नुकसान विचारात घेता अहमदनगर महानगरपालिकेमार्फत मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती,नगर यांचे अखत्यारीतील टंचाई गांवाना मनपा मार्फत त्यांच्या टँकरद्वारे पुरवठा केलेल्या पाण्याच्या बिलाच्या थकबाकीवरील व्याज/ विलंब आकार निर्लेखित करणेत येउ नये. असा ठराव पारित आहे.

यास्तव मा.जिल्हा न्यायाधीश-३ व मा.अति. सत्र न्यायाधीश अहमदनगर यांनी त्यांचे अखत्यारितीतील वरील नमूद नळ कनेक्शन पाणी बिलाच्या थकबाकीवरील व्याज/विलंब आकार निर्लेखित /क्षमापित करणेची केलेली मागणी व याच अनुषंगाने संदर्भिय पारित ठरावाची अवलोकनानुसार मे. न्यायालयाचे मागणी प्रमाणे पाणी बीलाच्या थकबाकीवरील व्याज / विलंब आकर निर्लेखित /क्षमापीत करणे संयुक्तीक वाटत नाही असे इकडील मत आहे.

तथापी मे.न्यायालयाचे मागणी बाबत वरिष्ठ स्तरावर निर्णय घेणे संयुक्तीक राहील आदेशार्थ सविनय सादर.

येणेप्रमाणे लिपिक ,पाणीपुरवठा विभाग यांचा अहवाल असे

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालातील नमुद ठराव क्र. ४० सभा क्र.८ दि.१/९/२०१२ चे आदेशान्वये मान्येने प्रस्तावात नमूद बाबी प्रमाणे पाणी बीलाच्या थकबाकी वरील व्याज / विलंब आकार निर्लेखित / /क्षमापित करणे संयुक्तीक वाटत नाही. तरी सदर बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा.) यांचा अभिप्राय की, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांच्या अभिप्रायानुसार कळविणे उचित होईल तथापी आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची अभिप्राय की, मुख्यलेखापरिक्षक कायदेशीर तपासून केले.

यावर लेखा परिक्षक / मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे अभिप्रायानुसार तसेच प्रस्तावीत केल्याप्रमाणे शिफारशी पाहता पाणी बीलाच्या थकबाकी वरील व्याज / विलंब आकार निर्लेखित /क्षमापीत करणे संयुक्तीक करत नाही तथापी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.स्थायी समिती पुढे विषय ठेवून व्याज / विलंब आकार क्षमापीत करता येईल. तरी मा.स्थायी समितीपुढे विषय ठेवून योग्य तो निर्णय घेणे उचित राहिल.

यावर सहाय्यक आयुक्त (कर) यांचा मुख्यलेखापरिक्षक व मुख्यलेखअधिकारी यांच्या अभिप्रायानुसार प्रस्तावीत केल्यानुसार मंजुरीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव सादर करणेसाठी मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण म.स्थायी समिती सभे पुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- मा. जिल्हा न्यायालयीन इमारतीची महानगरपालिकेची पाणीपटटी शास्ती कमी करणेबाबतचा प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

इंजिनियर श्री.सातपुते :- जिल्हा न्यायाधीश ३ व अतिसत्र न्यायाधीश अहमदनगर यांना नवीन न्यायालयीत इमारताकरीता मनपाकडून दोन इंची पाण्याचे कनेक्शन मिटर पध्दतीने सदर कनेक्शनने सन २०१९-२० चे पाणीपटटी बील पाठवले आहे या दोन बीलात शास्ती आकारण्यात आली आहे कोषागार कार्यालयाने सदरच्या बीलात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहे त्यामुळे कोर्टाचे बील मंजुर होत नाही त्यामुळे ते बील निर्लेखित करुन मिळावे अशी मागणी केली आहे.

मुख्यलेखाधिकारी श्री. मानकर :- शासकीय कार्यालयाचे बिलात दंड लावले तर बील पास होत नाही.

मा.श्री. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट नुसार विषय मंजूर करावा.

मा. श्री. सचिन शिंदे :- विषय मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- ठीक आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार व्याज / विलंब आकार क्षमापीत करण्यास मान्यता देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** ऑफिस रिपोर्टनुसार मा. जिल्हा न्यायालयीन इमारतीची महानगरपालिकेची पाणीपटटी शास्ती कमी करणेबाबतचा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १५२ नुसार व्याज / विलंब आकार क्षमापीत करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा. श्री. सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**मा. स्थायी समिती सभा क्र. ०१**

विषय क्रमांक- २२ गुरूवार दि.८/४/२०२१

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहातील सोनोग्राफी केंद्राकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी रेडीओलॉजिस्ट डॉक्टरांची प्रति केस मानधन प्रमाणे तीन वर्षाकरिता पॅनलशिपवर नेमणूक करणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर :-** कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह

संदर्भ :- १) डॉ.श्री.विनोद श्रीखंडे (सोनोलॉजिस्ट ) यांचा दिनांक १४/०१/२०२१ रोजीचा विनंती अर्ज.

२) डॉ.सौ.शितल तांदळे (सोनोलॉजिस्ट ) यांचा दिनांक ०३/०२/२०२१ रोजीचा विनंती अर्ज.

३) कै.बा.दवाखाना जा.क्र.५७ दिनांक १८०४/२०१८ ने पॅनल नेमणूक आदेशान्वये स्त्रीरोगतज्ञ डॉक्टरांची पॅनलशीपवर नेमणूक.

४) जा.क्र.कै.बा.दे.दवाखाना २२५ दिनांक २५/०६/२०१९ ने भुलतज्ञ डॉक्टरांचा पॅनल नेमणूक

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार विनंती रिपोर्ट की,अहमदनगर महानगरपलिकेचे कै.बा.दे.दवाखाना व प्रसुती गृह येथे दिनांक १ एप्रिल २०१३ पासुन केंद्र शासनाची व राज्य शासनाची जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम ही योजना दवाखान्यामध्ये कार्यान्वीत करण्यात आलेली आहे.सदरच्या योजनेनुसार दवाखान्यामध्ये देण्यात येणा-या प्रसुतीसंदर्भात सर्व सेवा सुविधा रूग्णांना महानगरपालिकेमार्फत मोफत पुरविण्यात येत आहेत.सदर योजनेचीचच एक बाब म्हणून मोफत सोनोग्राफी तपासणी सुविधा देण्यात येते.सदर सोनोग्राफी केंद्रावर डॉ.भाग्यश्री हंबीरे हया एकच मनपाच्या कायम पदावरील सोनोलॉजिस्ट कार्यरत आहेत.डॉ.सौ.हंबीरे यांच्या रजेच्या कालावधीमध्ये दवाखान्यामध्ये सोनोग्राफी केंद्राची सुविधा बंद राहते.डॉ.सौ.भाग्यश्री हंबीरे हया दिनांक ०१/०३/२०२१ पासुन दीर्घ मुदतीकरिता विषेश बालसंगोपन रजेवर गेलेल्या आहेत.त्यामुळे त्यांच्या रजेच्या कालावधीमध्ये दवाखान्यामध्ये सोनोग्राफी तपासणी सुविधा पुर्णपणे बंद आहे.सध्या ज्या रुग्णांना सोनोग्राफी तपासणी आवश्यकता भासते अशा रूग्णांची खाजगी सोनोग्राफी केंद्रामध्ये सोनोग्राफी तपासणी करून घ्यावी लागते.रूग्णांना आर्थिक भुर्दड सोसावा लागत असत्यामुळे दवाखान्यामध्ये नातेवाईक तक्रार करीत आहेत.

डॉ.सौ.भाग्यश्री हंबीरे यांच्या रजेच्या / सुट्टीच्या कालावधी मध्ये दवाखान्याची सोनोग्राफी सुविधा बंद राहु नये म्हणून शहरातील इच्छूक सोनोलॉजिस्ट यांची रू.४००/- प्रति सोनोग्राफी तपासणी या प्रमाणे मानधन निश्चित करून पॅनल तयार करणे आवश्यक आहे.तसेच पॅनलची नेमणूक केल्यानंतर एखादा रेडीओलॉजिस्ट डॉक्टरांनी पॅनलमध्ये नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केल्यास त्याच्या अर्जाचा विचार करून प्रस्ताव ठेवून प्रशासकिय मंजुरी घेवून पॅनलमध्ये त्यांना समाविष्ठ करण्यात येईल.सदरचे पॅनल नेमणे,त्यामध्ये नाव समाविष्ठ करणे/वगळणे त्यांचे मानधन अदा करणे बाबत सर्व कार्यवाही कै.बा.दे.दवाखान्याच्या कार्यालया मार्फत करण्यात येणार आहे.

संदर्भ क्र.१ व २ नुसार डॉ.श्री.विनोद श्रीखंडे व डॉ.सौ.शितल तांदळे यांनी पॅनलशीपवर रेडीओलॉजिस्ट म्हणून नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज दिलेला आहे.तसेच सध्या दवाखान्याकरिता वरील संदर्भ क्रमांक ० ३व ०४ नुसार अनुक्रमे स्त्रीरोगतज्ञ व भुलतज्ञ डॉक्टरांचे तीन वर्ष कालावधीकरिता पॅनलची नेमणूक करण्यात आलेली आहे.

तरी दवाखान्याची सोनोग्राफी सुविधा रेडीओलॉजिस्ट अभावी बंद पडू नये म्हणून वरील डॉ.श्री.विनोद श्रीखंडे व डॉ.सौ.शितल तांदळे हया रेडिओजॉजिस्ट डॉक्टरांची तीन वर्षाकरिता पॅनलशीपवर नेमणूक करून प्रति केस रू.४००/-(रू.चारशे फक्त) मानधन निश्चित करणेकामी प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयास्तव व मंजूरीस्तव सविनय सादर./अ

येणे प्रमाणे प्र.वैदयकिय अधिक्षक,कै.बा.दे.दवाखाना व सुतिका गृह यांचा अहवाल असे.

यावर सहाय्यक आयुक्त (कर) यांचे रजेवर

यावर मा.उपायुक्त यांची अभिप्राय की, प्रस्तावीत "अ" प्रमाणे रेडीओलॉजिस्ट डॉक्टरांचे पॅनल मा.स्थायी समितीचे विषय घेणेस मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

मा.आयुक्त साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

--***--

**चर्चा :-**

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखाना व प्रसुती गृहातील सोनोग्राफी केंद्राकरिता शहरातील इच्छुक व अनुभवी रेडीओलॉजिस्ट डॉक्टरांची प्रति केस मानधन प्रमाणे तीन वर्षाकरिता पॅनलशिपवर नेमणूक करणे बाबतचा प्रस्ताव विषयी आहे.

मा.श्री. शाम नळकांडे :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार ऑफिस रिपोर्ट सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आला.

श्रीमती.तरोटे :- भाग्यश्री हंबीरे रेडीओलॉजीस्ट दि.१/३/२०२१ पासून दिर्घ मुदतीकरीता विशेष बालसंगोपन रजेवर आहेत. प्रति केस ४०० रुपये प्रमाणे देणार आहोत.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- ऑफिस रिपोर्ट नुसार विषय मंजूर करावा.

मुख्यलेखाधिकारी श्री. मानकर :- पाणी पुरवठा विभागासाठी १०९ कर्मचारी घेण्यास या सभेने मंजुरी दिली आहे साधारणात वर्षाला रू. ३ कोटी खर्चात भर पडणार आहे उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ बसावायासाठी माझी प्रशासनाच्या वतीने सूचना की गेली अनेक वर्षात पाणीपटटी रकमेत वाढ केलेल नाही पाणीपटटीच्या दरात वाढ करावी या प्रस्तावास कुठलेही आडकाठी न आणता दरवाढीस मंजुरी दयावी.

मा.सभापती साहेब :- आम्ही वसुलीची मिटींग घेणार आहोत १०९ लोक वसुलीचे कर्मचारी कोवीड साठी घेतले आहेत वसुली कर्मचा-यांना वसुलीचे उददीष्ट ठरवून दिलेले आहे. तेवढी वसुल झाले नाही तर त्याला दोषी कोणाला धरायचे वसुली ठप्प पडली तर कसे करणार जी पटटी वसुल होणार ती ही होणार नाही त्याच काय

मुख्य लेखा अधिकरी श्री. मानकर :- प्रथम प्राधान्य कोवीड ला दयावे लागेल.

मा.सभापती साहेब :- कोरोनाला जर पैसा लागला तर तो कोढून आणणार बॅलन्स राहिला तरच खर्च करता येईल.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- कोवीड साठी मा.शासन निधी देतेच आहे.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- ६००० रूग्ण सापडतील अशी शक्यता आहे त्यांची ट्रेसिंग टेस्टींग करून घेणे गरजेचे आहे. त्यामुळे पुढे ताण येवु शकतो पुढेच १०-१५ दिवस लोकांचा कोरोनापासून जीव वाचवावा लागेल. सगळेच विभागाचे कर्मचारी कोरोनासाठी घेतले आहेत. १५ दिवसानंतर विचार करू

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- शहराची यंत्रणा कोसळू नये असे होवू नये ८०% बेड खाजगी हॉस्पीटलसाठी राखी व ठेवू असा शासनाने निर्णय घेतला त्याबाबत काय कारवाई चालू आहे.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- शासन निर्णयानुसार हॉस्पीटल पालन करित आहेत. त्याव्यरिरिक्त बेड वाढले आहेत. वारंवार आढावा बैठका घेत आहोत व सूचना देत आहेत मिटींग कायम होत आहेत.

मा.श्री.प्रकाश भागानगरे :- कोरोनाचे रूग्ण रूग्णालयात भरती होताना ॲडाव्हान्स रक्कम भरणेसाठी सक्ती करू नये याबाबत शासनाने आदेश निर्गमीत केले बाबत मा.श्री. राजेशजी टोपे , आरोग्यमंत्री साहेबांनी माहिती दिली आहे याबाबीचे पालन खाजगी रूग्णालयाकडून होते की नाही यावर आपले बारबाईने लक्ष असले पाहिजे.

मा.उपायुक्त (कर)श्री. डांगे :- सध्याची शहरातील कोरोनाची परिस्थिती गंभीर आहे.

मा.श्री. प्रकाश भागानगरे :- कोरोना रूग्ण मृत्यु प्रमाण वाढले आहे कोरोना रूग्णाचे अंत्यविधीला वेळ लागत आहे अंत्यविधी लवकर करून घ्या यासाठी मयताचे नातेवाईकांचे फोन येतात. मन हेलावणारी अशी घटना आहे.

मा.उपायुक्त (कर) डांगे :- शहरातील परिस्थिती गंभीर आहे.

मा.श्री. सागर बोरूडे :- ऑफिस रिपोर्ट नुसार विषय मंजूर करावा.

मा. श्री. सचिन शिंदे :- विषय मंजूर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याची सोनोग्राफी सुविधा रेडीओलॉजिस्ट अभावी बंद पडू नये म्हणून वरील डॉ.श्री.विनौद श्रीखंडे व डॉ.सौ.शितल तांदळे हया रेडिओजॉजिस्ट डॉक्टरांची तीन वर्षाकरिता पॅनलशीपवर नेमणूक करून प्रति केस रू.४००/-(रू.चारशे फक्त) मानधन निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच पॅनलची नेमणूक केल्यानंतर एखादा रेडीओलॉजिस्ट डॉक्टरांनी पॅनलमध्ये नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केल्यास त्याच्या अर्जाचा विचार करून प्रस्ताव ठेवून प्रशासकिय मंजुरी घेवून पॅनलमध्ये त्यांना समाविष्ठ करण्यात यावे.सदरचे पॅनल नेमणे,त्यामध्ये नाव समाविष्ठ करणे/वगळणे त्यांचे मानधन अदा करणे बाबत सर्व कार्यवाही कै.बा.दे.दवाखान्याच्या कार्यालया मार्फत करण्यात यावी.

**ठराव :-** ऑफिस रिपोर्टनुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्याची सोनोग्राफी सुविधा रेडीओलॉजिस्ट अभावी बंद पडू नये म्हणून वरील डॉ.श्री.विनौद श्रीखंडे व डॉ.सौ.शितल तांदळे हया रेडिओजॉजिस्ट डॉक्टरांची तीन वर्षाकरिता पॅनलशीपवर नेमणूक करून प्रति केस रू.४००/-(रू.चारशे फक्त) मानधन निश्चित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच पॅनलची नेमणूक केल्यानंतर एखादा रेडीओलॉजिस्ट डॉक्टरांनी पॅनलमध्ये नेमणूक करणेबाबत विनंती अर्ज केल्यास त्याच्या अर्जाचा विचार करून प्रस्ताव ठेवून प्रशासकिय मंजुरी घेवून पॅनलमध्ये त्यांना समाविष्ठ करण्यात यावे.सदरचे पॅनल नेमणे,त्यामध्ये नाव समाविष्ठ करणे/वगळणे त्यांचे मानधन अदा करणे बाबत सर्व कार्यवाही कै.बा.दे.दवाखान्याच्या कार्यालया मार्फत करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. सागर बोरूडे सही/-

अनुमोदक :- मा. श्री. सचिन शिंदे सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका